समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड द्वारा संचलीत

# संभाजी कॉलेज (कला व वाणिज्य) मुरुड ता.जि.लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबीर अहवाल

२७/०१/२०१९ ते ०२/०२/२०१९

समाज जागृती शिक्षण संस्था संचलित संभाजी महाविद्यालय, मुरुड रा.से.योजनेचे विशेष निवासी शिबीर "पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनसाठी युवक शिबीर व स्वच्छ भारत अभियान" २०१८-१९ हा विषय घेवून मौजे माटेफळ, जि. लातूर येथे दि. २७/०१/२०१९ पासून ०२/०२/२०१९ या कालात संपन्न झाले. या ७ दिवसाच्या शिबीराचा समारोप दि. ०२/०२/२०१९ रोजी मान्यवरांच्या हस्ते संपन्न आला.

या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. अॅड विजय पाटील (सचिव, समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड) हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. अशोक मोटे ( अधीसभा सदस्य स्वा. रा. ती. म. विदयापीठ, नांदेड शिवाजी महा. रेणापुर) हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक श्री. विकास गाढवे उपसंपादक दैनिक सकाळ, लातूर हे होते. प्रमुख उपस्थितामध्ये माटेफळ नगरीचे उपसरंपच प्रताप खोसे, प्राचार्य डॉ. ए. के. पिडगे, डॉ. खोसे बी. एस., सचिव महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ माटेफळ, महाविदयालयाचे ग्रंथपाल श्री. बीडवे एम. एस., श्री. दिपक पटाडे, माटेफळ येथील स्वामी विवेकानंद विदयालयाचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, तसेच प्रा. डॉ. गोरे बी.एम., प्रा. डॉ. कानडे ए. एस. ग्रामस्थ व विदयार्थी उपस्थित होते.

**या शिबिराचा थोडक्यात अहवाल पुढील प्रमाणे आहे.**

संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विषेश शिबीर आयोजित करण्यासाठी मागील वर्षी, माटेफळ नगरीच्या प्रथम नागरीक सरपंच सौ. राउत मंगल रामदास व ग्रामसेवक अधिकारी ग्रा. पं. मौजे माटेफळ श्री. निरुडे बी. एन. उपसरपंच खोसे प्रताप, खोसे बी. एन. यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्यांना मी आपल्या गावी शिबीर घ्यावे अशी विनंती केली. व त्यांनी महाविदयालयाच्या विनंतीस मान देउन तातडीने स्विकृती दिली. त्यानुसार मागील वर्षी शिबीर संपन्न झाले. तसेच चालू वर्षीही शिबीर घेण्यासाठी समंतीपत्र दिले. व निवास व्यवस्थेसाठी स्वामी विवेकानंद विदयालयाचे मुख्याध्यापक खोसे बी. एन. सहशिक्षक राउत सर, स्वामी विवेकानंद विदयालयाचे सचिव प्रा. डॉ. खोसे बी. एस. यांच्याबरोबर चर्चा करुन विदयालयात निवास स्थान निश्चित केले. त्याचबरोबर या गावात स्वंयसेवकांना श्रमदान करण्यासाठी कोणती कामे करता येतील याची पहाणी केली. व शिबीराची तारीख दि. २७ जाने. ते ०२ फेब्रुवारी २०१९ हि निश्चित केली.

Scanned with CamScanner

**दि. २७ जानेवारी २०१९** रोजी महाविदयालयातील सर्व शिबीरार्थींना घेवून आम्ही ठिक १.०० वाजता मार्गस्थ झालो. व साटेफळ येथे ठिक १.३० वाजता शिबीर ठिकाणी पोहचलो. दुपारी गावाची पहाणी करुन गावकऱ्यांशी चर्चा करुन पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने कोणती कामे करता येतील ते निश्चित केले व त्या दिवशी निवास ठिकाणचा परीसर स्वच्छ करुन घेतला. दिवाबत्ती, पाणी व्यवस्था, स्वयंपाकासाठी व्यवस्था करुन घेतली.

**दि. २८ जानेवारी २०१८** रोजी ठिक १० वाजता शिबीराचे रितसर उद्घाटन झाले. या उद्घाटन समारंभासाठी अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. बी. एस पटाडे (दादा) हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे मार्गदर्शक व उद्घाटक प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे (अध्यक्ष समाज प्रबोधन अकादमी, लातूर) हे उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये गावचे उपसरपंच खोसे प्रताप, सचिव डॉ. खोसे बी. एस., विवेकानंद विदयालयाचे मुख्याध्यापक श्री. खोसे बी. एन., प्राचार्य डॉ. पिडगे ए. के. प्रा. बिडवे एम. एस., शिक्षक वृंद, महाविदयालयातील प्राध्यापक व विदयार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुन्यानी मार्गदर्शन करताना राज्य घटनेचा अमल होउन सत्तर वर्षे झाली तरीपण समतेवर आधारीत समाज व्यवस्था निर्माण होऊ शकली नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी समाजात जातिव्यवस्था, अंधश्रधा,धार्मिकता कायम आहे. यामुळे शेतकरी आत्महत्येसारखे गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. यातून बाहेर निघण्यासाठी युवकांनी महापुरुषांचे विचार अंगिकारावेत. तसेच पुर्वी बहूजनांना शिक्षण घेण्यास बंदी होती. महापुरुषांच्या अथांग प्रयत्नांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खूली झाली. युवकानी समाजाला, अंधश्रधा व जातीयवादातून बाहेर काढले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजने मधून युवकांची जडणघडण होते. त्यांच्यातील सुप्त गुणाचा विकास होतो. देशप्रेम, सामाजीक बांधिलकी निर्माण होते. असे मत प्रतिपादन केले. तसेच याप्रसंगी प्रा. शिवाजी सुर्यवंशी , प्राचार्य पिडगे ए. के., खोसे बी. एस. यांचेही मार्गदर्शन झाले कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आंबाड सर यांनी केले. तर अध्यक्षयानी शिबीरार्थींनां शुभेच्छा दिल्या.

दुपारच्या बौध्दिक सत्रात महाविदयालयाचे मराठी विषयाचे प्रा. चुणचुणे नागनाथ वाचन संस्कृती काळाची गरज या विषयावर तर ग्रंथपाल प्रा. बिडवे एम. एस. यांनी ग्रंथालय आणि शैक्षणिक विकास या विषयावर व्याख्यान दिले.

Scanned with CamScanner

दि. २९ जानेवारी २०१९ रोजी सकाळी ठिक ८ वाजल्यापासून श्रमदानाला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत स्वयंसेवकांनी एका गल्लीत ८ शोषखड्डे (३X३) खोदून रस्त्यावर येणारे पाणी बंद केले.

तर दुपारच्या बैध्दिक सत्रात महाविदयालयातील प्रा. डॉ. भगत जी. एम. यांचे सायबर क्राईम या विषयावर व्याख्यान झाले. तसेच आपत्ती व्यवस्थापनात जिल्हा प्रशासनाची भूमिका या विषयावर प्रा. नागनाथ चुणचुणे यांचे मार्गदर्शन झाले.

दि. ३० जानेवारी २०१९ रोजी स्वयंसेवकानी सकाळी ठिक ८ वाजता रस्त्याचे उर्वरीत काम करण्यास सुरुवात केली व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शौचालय बांधलेले आहे. त्याठिकाणचा मोठा मुरुमाचा ढिग उचलून पाटीमागील खडयात भरला व (४ X ५) साईजचा मोठा शोषखडडा खनला व अन्य स्वयंसेवकांनी नवीन दोन शोषखडडे खनले.

तर दुपारच्या बैध्दिक सत्रात महाविदयालचे प्रा. डॉ. उबाळे एन. एन. यांचे मानव व पर्यावरण या विषयावर व्याख्यान पार पडले. तर भारतीय राज्यघटना या विषयावर प्रा. चव्हाण डि. आर. यांनी विचार मांडले.

दि. ३१ जानेवारी २०१९ रोजी स्वयंसेवकानी सकाळी ठिक ८ वाजता कामाला सुरुवात केली. व एका गल्लीत स्वंयसेवकांनी एकून ०६ दुस-या गल्लीत ०२ तिस-या गल्लीत ०२ असे दोन वाजेपर्यत १० शोषखडउे खोदून गावातील रस्त्यावरील येणारे पाणी पूर्ण बंद करुन टाकले.

दुपारच्या बैध्दिक सत्रात महाविदयालयाचे प्रा. डॉ. वाघमारे एच. एस. यांनी विदयार्थी व त्यांच्यासमोरील आव्हाने या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले. तर डॉ. गोरे बी. एम. यांचे भारतातील समस्या या विषयावर व्याख्यान झाले.

दि. ०१ फेब्रुवारी २०१८ रोजी स्वयंसेवकानी सकाळी ठिक ८ वाजता गावची साफसफाई करण्यास सुरुवात केली. गावचा मुख्य रस्ता, ग्रामपंचायत चौक मंदीर परीसर, शाळा परीसर, प्राथमिक आरोग्य केंदाचा परीसर व मुख्य चौक असा सारा गाव झाडून काढला व कच-याची विल्हेवाट लावली. तसेच ठिक १० वाजता गावक-यांसाठी महाविदयालय व ग्रामीन रुग्नालय, मुरुड यांच्या संयुक्त विदयमाने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात डॉ. महाजन दिपक, डॉ. मुंजाणे मॅडम यांनी विदयार्थ्यांना / गावक-यांना तंबाखू

Scanned with CamScanner

मुक्तीची शपथ दिली तसेच मार्गदर्शनही केले. शिबीरासाठी त्यांच्याबरोबर गड्डे गजानन, केमीस्ट सुजाता सुरनार (परीचारीका) लोंढे शितल (परीचारीका) यांनी परीश्रम घेतले. आणि गावातील एकुन ६७ रुग्नांना मोफत तपासनी व औषध वाटप करण्यात आले.

तर दुपारच्या बौध्दिक सत्रात महाविद्यालचे प्रा. डॉ. खोसे बी. एस. यांचे छत्रपती शिवाजी महाराज, आणि लोकशाही या विषयावर मार्गदर्शन झाले तर पाणी व्यवस्थापन काळाची गरज या विषयावर प्रा. गायकवाड एम. बी. मार्गदर्शन केले.

**दि. ०२ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ठिक १० वाजता शिबीराचा सांगता समारंभ संपन्न झाला.** एकंदरीत य शिबीरातून स्वयंम सेवकांना पर्यावरणाचे महत्व पटले, पर्यावरणाचा आरोग्याशी कसा संबंध आहे, त्यासाठी कोणती काळजी घ्यावी, पर्यावरणाचे रक्षण कसे करावे, स्वच्छता , आरोग्य, पर्यावरण संवर्धन हि काळाची गरज आहे त्यामध्ये युवकांचा सहभाग किती मोठा आहे याची जानीव झाली. त्याच बरोबर व्यक्तीमत्व विकास, राष्ट्रीय एकात्मता, सेवाभाव व श्रमप्रतिष्ठेचे महत्व स्वयं सेवकांना पटले.

गावची सेवा म्हणजे राष्ट्र सेवा आहे. माटेफळ मधील लोकांना स्वच्छतेचे महत्व पटले. ग्रामस्थांच्या समस्य जाणून घेण्याची संधी मिळाली. खेडयात राहून ग्रामस्थांशी सुसंवाद साधण्याची संधी मिळाली. म्हणून गांधीच्या संदेशाचे अकलन झाले. खरा भारत पाहयचा असलेतर खेडयाकडे चला हा संदेश्र अनुभवला. राष्ट्रीय सेवा याजनेचे ब्रिद वाक्य NOT ME BUT YOU हि भांवना स्वयंमसेवकात कायम स्वरुपी रुजली.

तसेच गावक-यांनी देखील प्रेम व सहकार्य केले. तसेच गावचे ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक दिपक हजारे, ग्रामपंचायत सेवक श्री. वाघमारे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या शिबीरासाठी संस्थेचे अध्यक्षक मा. श्री. पटाडे बी. एस.(दादा), सचिव अॅड. पाटील विजय, प्राचार्य डॉ. पिडगे ए.के., प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच माझे समिती सदस्य प्रा. चव्हाण डी. आर. प्रा. सौ. महाजन पी. बी., प्रा. चावरे एम. व्ही. याचे सहकार्य लाभले या शिबीरात एकून २६ मुले व १२ मुर्लींनी सहभाग नोंदवला.

डॉ. आर.एफ. आंबाड
कार्यक्रमाधिकारी
Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

डॉ. पिडगे ए. के.
प्राचार्य
Principal
Sambhaji College(Arts,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist Latur (M.S.)

Scanned with CamScanner

॥ गावचा विकास हाच आमचा ध्यास ॥

# ग्रामपंचायत कार्यालय, माटेफळ

**ता. जि. लातूर**

| : सरपंच : | : उपसरपंच : | : ग्रामसेवक : |
|---|---|---|
| सौ. मंगल रामदास राऊत | श्री. प्रताप छगन खोसे | श्री. निरुडे एल. बी. |
| मो. 9970971907 | मो. 9960175475 | मो. 9579955522 |

जा. क्र.

दिनांक : 11/04/2019

सदस्य :

श्री. बाळासाहेब आशोक पाटील

श्री. मच्छिंद्र ज्ञानोबा ओव्हाळ

सौ. स्वाती विलास सनगावकर

सौ. निर्मला प्रकाश शिंदे

सौ. सविता शाहु हजारे

श्री. वनमाला संजय कवडे

सौ. राधिका शरद कोळी

## मुल्यांकन प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, मुरुड येथील संभाजी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनसाठी युवक शिबीर व स्वच्छ भारत अभियान २०१८-१९ विशेष वार्षीक शिबीर दिनांक २७ जाने ते ०२ फेब्रुवारी २०१९ मध्ये मौजे. माटेफळ ता. जि. लातूर येथे संपन्न झाले.

दिनांक २७ जाने ते ०२ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत शिबीरार्थी व ग्रामस्थांच्या मदतीने ग्रामस्वच्छता, शोषखडडे, मुरुम उचलणे या श्रमदानाशिवाय अंधश्रध्दा निर्मूलन, जनप्रबोधनात्क विविध तज्ञांची व्याख्याने, आरोग्य शिबीर, सांस्कृतीक कार्यक्रमातून उदबोधन इ. साठी अंदाजित किंमत रु. ५००००/- (पन्नास हजार रु. मात्र) ची कामे पूर्ण केली.

करीता सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय, माटेफळ
ता. जि. लातूर

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्राम विकास अधिकारी
ग्रा.पं. माटेफळ
ता. जि. लातूर
ग्राम पंचायत कार्यालय
माटेफळ ता.जि.लातूर

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

३ प्रती

# लातूर news

# माटेफळ येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर

मुरुड : प्रतिनिधी

मुरुड राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचा माटेफळ येथे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बी. एस. पटाडे उपस्थित होते तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे हे उपस्थित होते.

मोरे म्हणाले की, राज्यघटनेचा अंमल होऊन सत्तर वर्ष झाले तरी पण समतेवर आधारित समाज व्यवस्था निर्माण होऊ शकला नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु अजूनही समाजात अनेक समस्या अस्तित्वात आहेत. जातीव्यवस्था अंधश्रद्धा, धार्मिकता, शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. यातून बाहेर निघायचे असल्यास महापुरुषांचे विचार युवकांनी अंगीकारणे आवश्यक आहेत. बहुजनांना शिक्षण घेण्यास बंदी होती. महापुरुषांच्या प्रयत्नांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुले झाली म्हणून शिक्षण घेऊन युवकांनी समाजाला अंधश्रद्धा, जातीवादातून बाहेर काढले पाहिजे.

राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना घडवत असते. त्यांच्या सुप्तगुणांचा विकास होऊन देशप्रेम सामाजिक बांधिलकी निर्माण होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. रामभन अंबाड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.बी.एस. खोसे यांनी करून दिला. प्राचार्य ए. के. पीडगे व शिवाजी सूर्यवंशी यांनीही शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मधुकर चावरे यांनी केले तर आभार सुरवसे महेश याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.दिपक चव्हाण, प्रा. पी. बी महाजन, प्रा. मधुकर क्षीरसागर, प्रा. बिडवे एम. एस. (ग्रंथपाल) यांनी परिश्रम घेतले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

सकाळ TODAY लातूर [illegible] ३

# महापुरुषांचे विचार अंगीकारा : प्राचार्य डॉ. मोरे

मुरुड, ता. २८ (बातमीदार) : [illegible] भारताला स्वातंत्र्य मिळाले [illegible] समाजात अनेक समस्या अस्तित्वात आहेत. समाजात जातिव्यवस्था, अंधश्रद्धा व धार्मिकता कायम आहे. यामुळेच शेतकरी आत्महत्येसारखे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. यातून बाहेर निघण्यासाठी युवकांनी महापुरुषांचे विचार अंगीकारावेत, असे मत प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे यांनी व्यक्त केले.

[illegible] वतीने माटेफळ (ता. लातूर) येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

समाजजागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. एस. [illegible] अध्यक्षस्थानी होते. डॉ. मोरे म्हणाले, "पूर्वी बहुजनांना शिक्षण घेण्यास बंदी होती. महापुरुषांच्या अथांग प्रयत्नांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. शिक्षणाचे महत्त्व ओळखून युवकांनी समाजाला अंधश्रद्धा व जातिवादातून बाहेर काढले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेतून युवकांचे [illegible] देशप्रेम व सामाजिक [illegible] निर्माण होते." यावेळी प्राचार्य डॉ. [illegible] व शिवाजी [illegible] यांची भाषणे झाली. यावेळी डॉ. बी. एम. [illegible], प्रा. [illegible], प्रा. पी. बी. महाजन, प्रा. मधुकर क्षीरसागर, प्रा. एम. एस. [illegible] प्राध्यापक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाधिकारी डॉ. [illegible] यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मधुकर [illegible] यांनी सूत्रसंचालन केले. महेश सुरवसे याने आभार मानले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

पुण्यनगरी Latur Rural बुधवार ३० जानेवारी २०१९ लातूर 11

# संभाजी महाविद्यालयाच्या 'रासेयो' शिबिराचे उद्घाटन



मुरुड / प्रतिनिधी

येथील संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचा माटेफळ येथे उद्घाटन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बी. एस. पटाडे उपस्थित होते. तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. मोरे म्हणाले की, राज्यघटनेचा अंमल होऊन सत्तर वर्षे झाले तरी पण [illegible] आधारित [illegible] निर्मिती होऊ शकली नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाले, परंतु अजूनही समाजात अनेक [illegible] अस्तित्वात आहेत. जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, धार्मिकता, शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. यातून बाहेर निघायचे असल्यास महापुरुषांचे विचार युवकांनी अंगीकारणे आवश्यक आहेत. यातून बाहेर पडायचे असेल तर विद्यार्थ्यांनी डोळसपणे वागले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. [illegible] अंबाड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. बी. एस. खोसे यांनी करून दिला. रासेयोचे प्राचार्य ए. के. शिंदे व शिवाजी सूर्यवंशी यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मधुकर [illegible] यांनी केले तर आभार [illegible] यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. दीपक चव्हाण, प्रा. [illegible] महाजन, प्रा. मधुकर [illegible], प्रा. [illegible] एस. एस. [illegible] परिश्रम घेतले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq.& Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

हॅलो लातूर | लातूर ग्रामीण | लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि. ३० [illegible] | ८

## मुरुड येथे रा.से.यो.चे विशेष युवक शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

मुरुड : येथील संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचे मौजे माळेफळ येथे उद्घाटन प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बी.एस. पटाडे होते. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. [illegible] यांनी केले. परिचय प्रा.डी. बी.एस. [illegible] यांनी करून दिला. प्राचार्य ए.के. शिंदे, [illegible] यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. [illegible] यांनी केले तर आभार [illegible] यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. दीपक [illegible], प्रा. पी.बी. महाजन, प्रा. मधुकर क्षीरसागर आदींनी परिश्रम घेतले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

लोकमत TODAY | लातूर

# पडेल ते काम करण्याची तयारी ठेवा

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

भ्रष्टाचार व ज्वलंत प्रश्नांवर वाचा फोडणारे वृत्तपत्र

: संपादक : बाळासाहेब जाधव, मो. 9766637050

: कार्यकारी संपादक : एखतियार दखनी, मो. 9860617738

sameertype@gmail.com

Weekly ◀ लातूर ◀ वर्ष :१० वे ◀ अंक :४४ ◀ सोमवार दि.०४ ते १० फेब्रु.२०१९ ◀ RNI No.MAHMAR/2009/31372 ◀ पाने ४ ◀ किंमत २ रुपया

# संभाजी महाविद्यालयाच्या रा.से.योजनेच्या शिबिराचे उद्घाटन

मुरूड (प्रतिनिधी):-संभाजी कॉलेज मुरुड राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचा मौजे माठेफळ येथे उद्घाटन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. बी. एस. पटाडे उपस्थित होते.तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ .विठ्ठल मोरे उपस्थित होते.

या प्रसंगी ते म्हणाले की राज्यघटनेचा अंमल होऊन सत्तर वर्ष झाले तरी पण समतेवर आधारित समाज व्यवस्था निर्माण होऊ शकली नाही.देशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु अजूनही समाजात अनेक समस्या अस्तित्वात आहेत. जातीव्यवस्था,अंधश्रद्धा, धार्मिकता, शेतकरी आत्महत्या वाढत आहेत .यातून बाहेर निघायचे असल्यास महापुरुषांचे विचार युवकांनी अंगीकारणे आवश्यक आहेत.तसेच बहुजनांना शिक्षण घेण्यास बंदी होती. राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना घडवत असते. त्यांच्या सुप्तगुणांचा विकास होऊन देशप्रेम सामाजिक बांधिलकी निर्माण होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रामधन अंबाड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ .बि.एस. खोसे यांनी करून दिला. तसेच श्री शिवाजी सूर्यवंशी सर यांनीही शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मधुकर चावरे यांनी केले तर आभार सुरवसे महेश याने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.दिपक चव्हाण , प्रा . सौं . पी.बि महाजन , प्रा . मधुकर क्षीरसागर , प्रा.बिडवे एम. एस. (ग्रंथपाल)यांनी परिश्रम घेतले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

लातूर
http://www.[illegible]lokmat.com
लोकमत

# संभाजी कॉलेजच्या रासेयोचे शिबिर

मुरूड : [illegible] राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचा समारोप समारंभ [illegible] फेब्रुवारी [illegible] (ता. लातूर) येथे झाला. अध्यक्षस्थानी जागृती शिक्षण संस्थेचे सचिव विजय पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर अशोक मोटे शिवाजी महाविद्यालय रेणापूर (अधिसभा सदस्य स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड) हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विकास गाढवे हे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. पिंडगे ए. के. डॉक्टर खोसे बी. एस. उपसरपंच प्रताप खोसे, दिपक मठाढे प्रा. शेटकार, प्रा. सूर्यवंशी, विवेकानंद विद्यालयाचे सहशिक्षक हे उपस्थित होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. मोटे, गाढवे यांनी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉक्टर अंबाड रामघेत यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन प्रा. चावरे मधुकर यांनी केले. याप्रसंगी शिबिरातील स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये पिसाळ अक्षय कुमारी कानडे असलेशा कुमारी प्रियंका माळी, सुरवसे महेश, चव्हाण धीरज यांनी मनोगत व्यक्त केले. आभार शेख नवाज याने मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राध्यापक व महाजन पी. बी. प्राध्यापक चव्हाण, प्राध्यापक बिडवे, प्राध्यापक अरुण कानडे यांनी परिश्रम घेतले. या शिबिरास ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, सदस्य, गावकरी यांनी मोलाचे सहकार्य केले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

NEWS

4 Latur Rural पुण्यनगरी

मंगळवार, ५ फेब्रुवारी २०१९ । लातूर

# संभाजी महाविद्यालयाच्या 'रासेयो' शिबिराचा समारोप

मुरुड/प्रतिनिधी

येथील संभाजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष युवक शिबिराचा समारोप माटेफळ येथे शनिवारी झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजजागृती शिक्षण संस्थेचे सचिव विजय पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे अधिसभा सदस्य व शिवाजी महाविद्यालयाचे डॉ. अशोक मोटे, पत्रकार विकास गादवे, प्राचार्य डॉ. पिडगे ए. के., डॉ. खोसे बी.एस., उपसरपंच प्रताप खोसे, दीपक पठाडे, प्रा. शेटकार, प्रा. सूर्यवंशी, विवेकानंद विद्यालयाचे सर्व सहशिक्षक हे उपस्थित होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉक्टर मोटे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉ. अंबाड रामधन यांनी प्रास्ताविकात सात दिवसांत केलेल्या कार्याचा अहवाल सादर केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. चावरे मधुकर यांनी केले. या प्रसंगी शिबिरातील स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये पिसाळ अक्षय, कु. कानडे आश्लेषा, कु. प्रियंका माळी, सुरवसे महेश, चव्हाण धीरज यांनी मनोगत व्यक्त केले. तर उपस्थितांचे आभार शेख नवाज याने मानले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. महाजन पी.बी., प्रा. दीपक चव्हाण, प्रा. मारुती बिडवे, प्रा. अरुण कानडे यांनी परिश्रम घेतले. या शिबिरास ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, सदस्य, गावकरी यांनी मोलाचे सहकार्य केले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

संभाजी कॉलेज मुरुड ता. जि. लातूर.

राष्ट्रीय सेवा योजना 2018-19

विशेष युवक शिबीर, मारफळ दि. 29/01/2019

श्रमदान कार्यक्रम







श्रमदान कार्यक्रमात शोषखड्डे खणत असताना स्वयंसेवक

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur-413510

Principal
Sambhaji College (Arts Com & Sci)
Murud Tq.& Dist Latur (M.S.)

Scanned with CamScanner

संभाजी कॉलेज मुरुड ता.जि. लातूर
राष्ट्रीय सेवा योजना 2018-19

विशेष युवक शिबीर दि. ३० जानेवारी 2019






जिल्हा प्राथमिक विद्यालय मोरेफळ येथील मुरुम भरून सपाटीकरण ~~[illegible]~~ शौचालयाकडे रस्ता करताना स्वयंसेवक.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Art's, Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)


Scanned with CamScanner

संभाजी कॉलेज मुरुड ता. जि. लातूर

राष्ट्रीय सेवा योजना 2018-19

विशेष युवक शिबीर

दि. 31 जानेवारी 2019







श्रमदान कार्यक्रमात गावात शोषखड्डे खनत असताना स्वयंसेवक


Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510


Principal
Sambhaji College (Arts, Com. & Sci.)
Murud Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

संभाजी कॉलेज मुरुड ता.जि. लातूर
राष्ट्रीय सेवा योजना 2018-19

विशेष युवक शिबीर, मारेफळ
दि. 31 जानेवारी 2019




बौद्धिक सत्रात मार्गदर्शन करताना. प्रा. डॉ. वाघमारे एच.एस
आणि. प्रा. डॉ. गोरे बी. एम.


Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts.Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

# संभाजी कॉलेज मुरुड ता.जि. लातूर
## राष्ट्रीय सेवा योजना 2018-19

### विशेष युवक शिबिर, मारेगाव
दि. 1 जानेवारी 2019



ग्रामसफाई करत असताना स्वयंसेवक.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड द्वारा संचलीत

# संभाजी कॉलेज (कला व वाणिज्य) मुरूड ता.जि. लातूर
## राष्ट्रीय सेवा योजना

Sambhaji College (Arts & Commerce) MURUD Dist. Latur (M.S.)

## विशेष शिबीर अहवाल

दिनांक 15/02/2020 ते 21/02/2020

समाज जागृती शिक्षण संस्था संचलित संभाजी महाविद्यालय, मुरूड रा.से.योजनेचे विशेष निवासी शिबीर

"पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धनासाठी युवक शिबीर" व स्वच्छ भारत अभियान 2019–2020 हा विषय घेऊन मौजे माटेफळ ता.जि. लातूर येथे दिनांक 15/02/2020 पासून 21/02/2020 या काळात संपन्न झाले या 7 दिवसाच्या शिबीराचा समारोप दिनांक 21/02/2020 रोजी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.ॲड. विजय पाटील (सचिव, समाज जागृती शिक्षण संस्था, मुरूड ) हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. ज्ञानेश्वर चौधरी (इंग्रजी विभाग, महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा) हे उपस्थित होते. प्रमुखउपस्थितीमध्ये प्राचार्य नरेंद्र माळी, माटेफळ नगरीचे उपसरपंच प्रताप खोसे, प्रा. डॉ. बी.एस. खोसे, (सचिव महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ माटेफळ) स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याद्यापक श्री. खोसे बी.एन, श्री. राजाभाऊ पाटील (वि.का.से.स.सो) दिपक हजारे सर्व सहशिक्षक तसेच प्रा. डॉ. मिना कदम, प्रा. डॉ. गोरे बी.एम. प्रा. चव्हाण डी. आर, ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते.

### या शिबीराचा थोडक्यात अहवाल

संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर आयोजीत करण्यासाठी माटेफळ गावचे प्रथम नागरीक सरपंच सौ. राऊत

Scanned with CamScanner

मंगल रामदास व ग्रामसेवक श्री. माडेबोयने साहेब माटेफळ उपसरपंच प्रताप खोसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांना कार्यक्रम अधिकारी म्हणून मी आपलेगाव तीन वर्षापासून दत्तक घेतले आहे व हे शेवटचे वर्ष आहे म्हणून शिबीर घ्यावे अशी विनंती केली त्यांनी महाविद्यालयाच्या विनंतीस मान देऊन ताबडतोब आपली स्विकृती दिली. मागील दोन वर्षा पासून अतिशय चांगलया पद्धतीने शिबीर संपन्न झाले. चालू वर्षीही शिबीर घेण्यासाठी संमत्तीपत्र दिले व निवासव्यवस्थेसाठी स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक खोसे बी.एन विवेकानंद विद्यालयाचे सचिव प्रा.डॉ खोसे बी.एस. सहशिक्षक राऊत सर यांच्या बरोबर चर्चा करून विद्यालयात निवास्थान निश्चित केले तसेच गावात स्वयंसेवकांना श्रमदान करण्यासाठी कोणती कामे करता येतील याची पाहणी केली व शिबीराची तारीख दिनांक **15 फेब्रुवारी 2020 ते 21 फेब्रुवारी 2020** ही निश्चित केली.

**दिनांक 15 फेब्रुवारी 2020** रोजी महाविद्यालयातील सर्व शिबीरार्थींना घेऊन आम्ही ठिक 12:30 वाजता मार्गस्थ झालो व माटेफळ येथे ठिक 1:00 वाजता शिबीर ठिकाणी पोहचलो. गावात आल्यानंतर गावची पाहणी करून गावकऱ्यांशी चर्चा केली. पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने कोणती कामे करता येतील ते निश्चित केले व निवास ठिकाणचा परिसर स्वच्छ करून घेतला व पाणी दिवाबत्ती, स्वयंपाकासाठी व्यवस्था करून घेतली.

**दिनांक 16 फेब्रुवारी 2020** रोजी ठिक 10:00 वाजता शिबीराचे उद्‌घाटन झाले. उद्‌घाटन कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून समजा जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बी.एस. पटाडे (दादा) हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे मार्गदर्शक व उद्‌घाटक म्हणून प्राचार्य डॉ. अजय पाटील (श्रीमती सुशिलादेवी देशमुख महाविद्यालय, लातूर) हे उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थितीध्मये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र माळी, उपसरपंच खासे प्रताप, प्रा. डॉ. खोसे बी..एस. (सचिव महाराष्ट्र शिक्षण प्र. मंडळ

Scanned with CamScanner

फोटो

माटेफळ) प्रा. डॉ. पिडगे, मुख्याध्यपक श्री. खोरो बी.एन., प्रा. बिडवरो एम. एस व शिक्षकवृंद महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्यानी मार्गदर्शन करताना युवकांनी धर्म जात पात बाजूला ठेवून देश महत्वाचा समजून पुढे आले पाहिजे आणि हेच मुल्य राष्ट्रीय सेवा योनजेमध्ये रुजविले जाते म्हणून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रा.से.यो. मध्ये सहभाग नोंदवावा असे अहवान यावेळी प्रमुख पाहुण्यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र माळी सरांनीविद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कायक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्राधिकारी प्रा. डॉ. चावरे एम.व्ही. यांना केली. अध्यक्षीय समारोपात अध्यक्षांनी शिबीरार्थीना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. गोरे बी.एम. यांनी तर उपस्थितीचे आभार प्रा. डॉ. मीना कदम यांनी माणले या वेळी प्रा. चव्हाण डी.आर., सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

दुपारच्या बौध्दीक सत्रात महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक प्रा. नागनाथ चुणचुणे यांनी नामदेव रसाळांची कविता या विषयावर तर ग्रंथपाल प्रा. बिडवे एम.एस. यांनी आधुनिक काळात ग्रंथालयाची भूमिक या विषयावर मौलीक व्याख्यान दिले.

**दिनांक 17 फेब्रुवारी 2020** रोजी सकाळी 8 वाजल्यापासून श्रमदानाला सुरवात झाली. पहिल्या दिवशी दुपार पर्यंत स्वयंसेवकानी हजारे गल्ली मधील 5 शोषखड्डे ( 4×3 ) खोदून त्या ठिकाणचे येणारे घाण पाणी बंद केले.

दुपारच्या बौध्दीक सत्रात महाविद्यालयातील प्रा. डॉ. एच.एस. वाघमारे लोकसंख्या वाढ व भारतापुढील समस्या या विषयावर तर प्रा. डॉ. जाधव जी.एल. यांनी नैसर्गिक साधनसंपत्ती काळाची गरज यावर व्याख्यान दिले.

**दिनांक 18 फेब्रुवारी 2020** रोजी स्वयंसेवकांनी सुरवातील गावात सप्ता आल्यामुळे गावातील मंदिर परिसर पूर्ण स्वच्छ साफसफाई करून उर्वरीत राहिलेलया कामाकडे येवून त्याच दिवशी हजारे गल्लीतील

Scanned with CamScanner

जवळपास 100 फुट लांबीची नाली खोदकाम केले तर दुपारच्या बौध्दीक सत्रात वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. कानडे ए.एस. मराठवाड्यातील उद्योजकीय संधी आणि ग्रामीण विकास या विषयावर तर प्रा. डॉ. मीना कदम यांनी रा.से.यो. व व्यक्तिमत्व विकास यावर मार्गदर्शन केले.

**दिनांक 19 फेब्रुवारी 2020** रोजी छत्रपती शिवाजीराजे भोसले जयंती शिबीर स्थळी साजरी केली. यावेळी सुरवातीस विवेकांनद विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. खोसे व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चावरे यांनी पुष्पहार घालून शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी प्रा. डॉ. गोरे बी.एम. यांनी रयतेचा राजा शिवाजी महाराज यावर मार्गदर्शन केले सर्व स्वयंसेवकानी अभिवादन करून श्रमदानासाठी विद्यालयातील परिसर 200 फुट नाली खोदकाम करून खऱ्या अर्थाने स्वयसेवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांना श्रमदानातून अभिवादन केले.

दुपारच्या बौध्दीक सत्रात प्रा. गायकवाड एम.बी. यांनी (Climate Emergency) व प्रा. डॉ. खोसे बी.एस यांनी शिवाजी महाराजावर व्याख्यान दिले.

**दिनांक 20 फेब्रुवारी 2020** रोजी स्वयंसेवकांनी सकाळी 8 वाजता विद्यालयातील परिसर साफसफाई व गावातील साफसफाई केली. यात गावचा मुख्य रस्ता, ग्रामपंचायत चौक, मंदिर परिसर, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्राचा परिसर झाडून कचऱ्याची विल्हेवाट लावली. ठिक 10 वाजता गावकऱ्यांसाठी, महाविद्यालय व ग्रामीण रूग्णालय मुरूड यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात डॉ. मुंढे, डॉ. सुजाने मॅडम यांनी गावकऱ्याची अरोग्य तपासणी करून मोफत औषध वाटप केले. एकूण 53 रूग्णाची आरोग्य तपासणी करण्यात आली.

**दिनांक 21 फेब्रुवारी 2020** रोजी सकाळी ठिक 10 वाजता शिबीराचा समारोप समारंभ संपन्न झाला.

Scanned with CamScanner

या शिबीरातून शिबीरार्थींना पर्यावरणाचे महत्व पटले. पर्यावरणाचा आरोग्याशी कसा संबंध आहे कोणती काळजी घ्यावी, पर्यावरणाचे रक्षण कसे करावे, स्वच्छता आरोगय पर्यावरण संवर्धन काळाची गरज आहे, व्यक्तीमत्व विकास राष्ट्रीय एकात्मता, सेवाभाव व श्रमाचे महत्व स्वंयसेवकांना पटले.

"खरा भारत खेडयातच आहे म्हणून खेडयाकडे चला" हा गांधीचा संदेश आकलन झाला. रा.से.यो.चे ब्रीद वाक्य NOT ME BUT YOU ही भावना रूजली.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी गावकऱ्यांनी सहकार्य केले. गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक या सर्वांचे मोलांचे सहकार्य लाभले.

या शिबीरासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बी.एस. पटाडे (दादा), सचिव ॲड विजय पाटील, प्राचार्य डॉ. नरेंद्र माळीसर, तसेच माझे समिती सदस्य प्रा. डॉ. मीना कदम, प्रा.डॉ. गोरे बी.एम., प्रा. चव्हाण डी.आर, यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याशिबीरात एकूण 21 मुले व 17 मुलींनी सहभाग नोंदविला.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

|| गावचा विकास हाच आमचा ध्यास ||

# ग्रामपंचायत कार्यालय, माटेफळ

ता. जि. लातूर

• सरपंच •
सौ. मंगल रामदास राऊत
मो. 9970971907

• उपसरपंच •
श्री. प्रताप धगन खोसे
मो. 9960175475

• ग्रामसेवक •
श्री. माडीबोयणे
मो. 8788726996

(शिक्का: ग्रामपंचायत कार्यालय माटेफळ ता. जि. लातूर)

जा. क्र.

दिनांक : 12/03/2020

**: सदस्य :**

श्री. बाळासाहेब अशोक पाटील

श्री. मच्छिंद्र ज्ञानोबा ओव्हाळ

सौ. स्वाती विलास सनगावकर

सौ. निर्मला प्रकाश शिंदे

सौ. सविता शाहू हजारे

सौ. वनमाला संजय कवडे

सौ. राधिका शरद कोळी

## —: प्रमाण पत्र :—

प्रमाणित करण्यात येते की मुरुड येथील संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे 'पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर' व स्वच्छ भारत अभियान 2019-20 विशेष वार्षिक शिबिर दि. 15 फेब्रु ते 21 फेब्रु 2020 मध्ये मौजे - माटेफळ ता. जि. लातूर येथे संपन्न झाले.

दि. 15 फेब्रु ते 21 फेब्रु 2020 या कालावधीत शिबीरार्थी व ग्रामस्थांच्या मदतीने ग्रामस्वच्छता शोषखड्डे, नालीखोद काम या श्रमदानाशिवाय अंधश्रध्दानिर्मुलन, जनप्रबोधन विविध तज्ञांची व्याख्याने, आरोग्य शिबीर, सांस्कृतिक कार्यक्रमातून उद्बोधन इ. कार्यक्रमुळे ग्रामस्थांना फायदा व ज्ञानप्रबोधन झाले.

श्रमदान बौध्दिक कार्यक्रम व प्रबोधनात्मक व्याख्याने इ. मुळे ग्रामस्थांना एक नवी दिशा मिळाली व हे शिबीर यशस्वी संपन्न झाले.

करीता सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत कार्यालय
माटेफळ ता.जि.लातूर

(स्वाक्षरी)
सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय, माटेफळ
ता. जि. लातूर

(स्वाक्षरी)
Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

(स्वाक्षरी)
Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

तहसिल

Postal Lic- OMD-417/2020-2022

Weekly ◀ लातूर ◀ वर्ष :१० वे अंक : ४३ ◀ सोमवार १७ ते २३ फेब्रुवारी २०२० ◀ RNI No.MAHMAR/2009/31372 ◀ पाने ४

# संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उदघाटन



मुरूड (वार्ताहर):- संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पर्यावरण व नैसर्गीक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर व स्वच्छ भारत अभियानाच्या उदघाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी.एस. पटाडे (दादा) हे होते. विचारमंच डॉ.बी.एस खोसे उपसरपंच प्रताव खोसे, राजाभाऊ पाटील,उपप्राचार्य व संजय नाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणाले की भारत हा तरुणांचा देश आहे तरुणांची पर्यावरण संवर्धणाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली तर आपल्या देशातील प्रमुख गंभीर समस्या नष्ट होऊ शकते.(पान ४ वर)

## संभाजी महाविद्यालयाच्या ....

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे उदघाटन बी.एस. पटाडे दादा म्हणाले की आपले पूर्वज जी झाडे लावत होती ती वड,चिंच,पिंपळ,लिंब ई दिर्घायूषी झाडे आज लावली पाहिजे व त्यांची जोपसना केली तरच पर्यावरणाचे संवर्धन होईल.

महाविद्यालयचे प्राचार्य डा.नरेंद्र माळी पाहुण्याच्या परिचय व आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.चावरे एम.व्ही यांनी केले सुत्र संचलन प्रा. डॉ. संचलन प्रा.डॉ.बालाजी गोरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.मीना कदम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डी.आर.चव्हाण रा.से.यो. स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

Principal
Sambhaji College(Arts,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist Latur (M.S.)

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

# तहसिल

Postal Lic- OMD-417/2020-2022

Weekly ◂ लातूर ◂ वर्ष :१० वे अंक : ४४ ◂ सोमवार २४ फेब्रु. ते ०१ मार्च २०२० ◂ RNI No.MAHMAR/2009/31372 ◂ पान ४


## राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीराच्या समारोप



मुरुड (प्रतिनिधी):- संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. विजय पाटील हे होते विचारमंचावर उपसरपंच प्रताप खोसे,राजाभाऊ पाटील, प्रा.डॉ. खोसे,बी.एस. दिगांबर खोसे, बिभिषण घोडके,दिपक हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की समाजात न बोलवारे मुके लोक चाळीसीत पण नुसतेच बोलणारे पण कृतत्व नसनारे लोक चालणार नाहीत कारण बोलण्यापेक्षा कृती महत्वाची आहे म्हणून समाजात कृत्तत्वान व्यक्तीलाच जास्त सन्मान मिळाला पाहिजे. सतत चालणाऱ्या शिबीरात श्रमदान,ग्रामसफाई, शोषखड्डे, नाली आरोग्य शिबीर इ. कामे करण्यात आली तर बौध्दिक सत्रात प्रा.चुणचुणे एन.एच,प्रा. बिडवे एम.एम.,प्रा.डॉ. कानडे ए.एस., प्रा.डॉ.मीना कदम,प्रा.गायकवाड, प्रा.डॉ. बालाजी गोरे,प्रा. डॉ. खोसे, प्रा.डॉ. वाघमारे, प्रा.डॉ. जाधव जी.एल. यांनी वेगवगळे विषयावर मार्गदर्शन केले, यावेळी अध्यक्षीय समारोप प्रसंगी ॲड.विजय पाटील म्हणाले की माणसाच्या जीवनात साधना,सेवा,सदसंग आत्यंत आव्यक आहे. प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी कु.माने,कु.खोत,कु. खाडेकर,कठारे शुभम या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चात्रे मधुकर यांनी केले. सुत्रसंचलन कु.दिव्यता खोसे या विद्यार्थीनीने तर उपस्थितांचे आभार चौधरी अशोक यांनी मानले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner


संभाजी कॉलेज मुरुड ता.जि. लातूर
रा.से.यो. 2019-20

विशेष युवक शिबिर मौजे माटेफळ

दि 17/02/2020




श्रमदान कार्यक्रमात शोषखड्डे खोदत असताना स्वयंसेवक.




Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sci)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

संभाजी कॉलेज मुरुड ता.जि. लातूर
रा.से.यो. २०१९-२०
विशेष युवक शिबिर मौजे मातेफळ दि. १७/०२/२०२०
बौद्धिक सत्र – मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. एन.एस. वाघमारे




मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. जाधव जी.एम.




Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& Sc.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner


संभाजी कॉलेज मुरुड ता.जि लातूर
रा.से.यो 2019-20
विशेष श्रम शिबिर मौजे मातेफळ

दि 18/02/2020

श्रमदान करताना स्वयंसेवक




दुपारी जेवणाचा आस्वाद घेताना स्वयंसेवक.




Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com & Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

संभाजी कॉलेज मुरुड ता.जि. लातूर.
रा.से.यो.
2019-20

विशेष श्रमदान शिबीर मौजे.मातेफळ. दि.17/2/2020

शिबीर स्थळी छ. शिवाजी महाराजांची जयंती साजरी करताना.




दोरीच्या साह्याने मोठा दगड वर काढताना स्वयंसेवक व प्रा.डॉ. खोसे म





Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510


Principal
Sambhaji College(Arts,Com.& Sci.)
Murud Tq.& Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

संभाजी महाविद्यालय कॉलेज मुरुड ता.जि. लातूर
रा.से.यो. - 2019-20

विशेष युवक शिबीर मौ. मातेफळ समारोप समारंभ दि. 21/02/2020




प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. जोगदंड, सचिव मा.ॲड विजय पाटील, प्राचार्य नरेंद्र माळी प्रा.ग्रोस्कोर यांच्या समवेत सर्व स्वयंसेवक (शिबिरार्थी)

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College(Art's,Com.& ...
Murud Tq.& Dist. Latur

Scanned with CamScanner

MURUD

समाज जागृती शिक्षण संस्था मुरूड द्वारा संचलित,

**संभाजी कॉलेज (कला, वाणिज्य व विज्ञान)**

**मुरूड ता.जि.लातूर**

राष्ट्रीय सेवा योजना

विशेष शिबीर अहवाल

**दिनांक १९ मार्च २०२२ ते २५ मार्च २०२२**

**समाज जागृती शिक्षण संस्था संचलित संभाजी महाविद्यालय मुरूड रा.से.योजनेचे विशेष निवासी शिबीर**

पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर व स्वच्छ भारत अभियान २०२१–२२ हा विषय घेवून मौजे माटेफळ ता.जि.लातूर येथे दिनांक १९ मार्च २०२२ ते २५ मार्च २०२२ या कालावधित संपन्न झाले. या सात दिवसीय निवासी शिबीराचा समारोप दिनांक २५ मार्च २०२२ रोजी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.ॲड.विजय पाटील (समाज जागृती शिक्षण संस्था मुरूड) हे होते तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून दयानंद कॉलेज लातूर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख मा.प्रा.डॉ.संतोष पाटील हे उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.नरेंद्र माळी, माटेफळ नगरीचे सरपंच सौ.अल्का विठ्ठल खोसे, उपसरपंच मा.शिंदे संजय बब्रुवान, जि.प.प्रा.शा.माटेफळचे मुख्याध्यापक श्री.कांबळे आर. एस., शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.खोसे संतोष दगडू, मेजर बालाजी गुटलकर, शाळेतील सर्व शिक्षकवृंद तसेच प्रा.डॉ.गोरे वी.एम.,प्रा.डॉ.मीना कदम, प्रा.चव्हाण डी.आर., माटेफळचे ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# शिबीराचा थोडक्यात अहवाल

संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर आयोजित करण्यासाठी माटेफळ गावचे प्रथम नागरिक सरपंच सौ. अल्का विठ्ठल खोसे व ग्रामसेवक मा.माडेवोयने साहेब तसेच उपसरपंच मा.शिंदे संजय बबुवान, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. खोसे संतोष दगडू, जि.प.प्रा.शा.माटेफळचे मुख्याध्यापक श्री.कांबळे आर.एस. यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मागील दोन वर्षापासून कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे रा.से.योजनेचे शिबीर होवू शकले नाही. पण यावर्षी कोविड १९ चा प्रादुर्भाव कमी झाल्याने विद्यापीठाने शिबीर घेण्यासाठी परिपत्रक काढले त्यानुसार कार्यक्रमाधिकारी म्हणून शिबीर घेण्यासाठी गावांची शोधाशोध करत होतो परंतू कोविड १९ च्या भीतीमुळे गावातील नागरिक प्रतिसाद देत नव्हते मात्र माटेफळ गावात मागील काळात दत्तक योजने अंतर्गत शिबीर झालेले होते. यामुळे माटेफळ गावाला रा.से.योजनेच्या कामाच्या स्वरूपाची गावकऱ्यांना जाणीव होते. रा.से. योजनेच्या मागील काळातील शिबीरामुळे गावात झालेला बदल हा विकासाभिमुख होता यामुळे यावर्षी देखील शिबीर गावात घेण्याबाबत माटेफळचे सरपंच सौ.अल्का विठ्ठल खोसे यांच्याशी चर्चा करण्यात आली. आणि लागलीच त्यांनी शिबीर घेण्यास अनुमती दिली. त्यानंतर निवास व्यवस्थेसाठी गांवातील जि.प.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक श्री.कांबळे आर.एस व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.खोसे संतोष दगडू यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यानंतर जिल्हा प्रशाला येथे निवासस्थान निश्चित करण्यात आले. यानंतर गावात स्वयंसेवकांना श्रमदान करण्यासाठी कामाची पाहणी करण्यात आली व शिबीराची तारीख **१९ मार्च २०२२ ते २५ मार्च २०२२** निश्चित करण्यात आली.

**दि.१९ मार्च २०२२** रोजी महाविद्यालयातील निवड केलेल्या सर्व शिबीरार्थींना घेवून आम्ही ठिक १.०० वाजता मार्गस्थ झालो व माटेफळ येथे १.३० मिनिटाला शिबीरस्थळी पोहचलो. गावात गेल्यानंतर गावची पाहणी करून ग्रामस्थांशी चर्चा करण्यात आली. पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने कोणती कामे करता येतील हे निश्चित केले व निवास ठिकाणचा परिसर साफसफाई करून पाणी, दिवाबत्ती व स्वयंपाकासाठी व्यवस्था करून घेतली.

Scanned with CamScanner

**दि.२० मार्च २०२२** रोजी सकाळी १०.३० वाजता रितसर शिबीराचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.बी.एस. पटाडे दादा उपस्थित होते तर प्रमुख मार्गदर्शक व उद्घाटक म्हणून महात्मा बसवेश्वर कॉलेज, लातूर वाणिज्य विभागाचे प्रा.डॉ.शिवप्रसाद डोंगरे उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.नरेंद्र माळी, माटेफळ नगरीचे सरपंच सौ.अल्का विठ्ठल खोसे, उपसरपंच मा.शिंदे संजय बब्रुवान, जि.प.प्रा.शा.माटेफळचे मुख्याध्यापक श्री. कांबळे आर.एस., शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.खोसे संतोष दगडू, मेजर बालाजी गुटलकर, शाळेतील सर्व शिक्षकवृंद तसेच माटेफळचे ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौध्दीक आणि मानसिक विकासात अमुलाग्र बदल हा केवळ राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच होवू शकतो असे प्रतिपादन प्रा.डॉ.शिवप्रसाद डोंगरे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही यांनी केले. अध्यक्षीय समारोपांत अध्यक्षांनी पुढील कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ.गोरे बी.एम. यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.मीना कदम यांनी मानले. यावेळी प्रा. चव्हाण डी.आर. व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

उद्घाटन सत्रानंतर दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.मीना कदम यांनी 'राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तीमत्व विकास' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच मराठी विभागातील प्रा.मोतीबोने एस.आर. यांनी 'आजच्या युवकांसमोरील आव्हाने' या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**दि.२१ मार्च २०२२** रोजी सकाळी श्रमदान करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणातील दोन ट्रक मुरमाचा भर स्वयंसेवकांनी समपातळीवर साफ करून त्यावर शहाबादी फरशी अंथरली जवळपास दोन ब्रास फरशी स्वयंसेवकांनी अंथरली. दुपारच्या भोजनानंतर व विश्रांती नंतर बौध्दिक सत्रात प्रा.सुर्यवंशी ए.व्ही यांनी 'युवा शिक्षण' या विषयावर

Scanned with CamScanner

विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन, आभार स्वयंसेवकांनीच केले.

**दि.२२ मार्च २०२२** रोजी सकाळी दैनंदिन कार्यक्रम आटोपून जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात पुढील दिवशी उर्वरित काम करण्यात आले यामध्ये स्वयंसेवकांनी दहा बाय चाळीस फुट अंतर असलेला खड्डा मुरूमाने भराव टाकून त्यावर देखील शहाबादी फरशी बसवून एक लेवल करण्यात आली. व परिसरात अस्ताव्यस्त असलेल्या शहाबादी फरशीचे तुकडे एकत्र करून व्यवस्थितरित्या एका बाजूस ठेवण्यात आले. अशा रितीने परिसर स्वच्छ आणि साफ करण्यात आला. भोजना नंतर स्वयंसेवकांना विश्रांती देण्यात आली त्यानंतर दुपारच्या बौध्दिक सत्रात महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.रणदिवे डी.एम. यांनी 'रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर तर प्रा.गायकवाड एम.बी. (इंग्रजी विभाग) यांनी 'नवीन शैक्षणिक धोरण' यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**दि.२३ मार्च २०२२** रोजी सकाळी दैनंदिन कामे आटोपून जिल्हा परिषद शाळेसमोरील दर्शनी भागात असलेल्या गेट शेजारील दुर्गंधीयुक्त असलेला खड्डा स्वयंसेवकांनी मुरमाचा भराव टाकून साफ केला. या खड्यात घाणीचे साम्राज्य पसरलेले होते यामुळे हा खड्डा आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक होता यामुळे हा खड्डा साफ करणे अत्यंत गरजेचे होते. स्वयंसेवकांनी परिश्रमपूर्वक हा खड्डा स्वच्छ आणि साफ केला. त्यांनतर संपूर्ण गावची साफसफाई करण्यात आली. भोजनानंतर दुपारील सत्रात प्रा.डॉ.भगत जी.एम. यांनी 'संत कबीर' या विषयावर तर क्रिडा शिक्षक प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी मानवी जीवनातील खेळाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले.

**दि.२४ मार्च २०२२** रोजी सकाळी ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्र माटेफळ येथे स्वयंसेवकांनी परिसरात वृक्षारोपनासाठीचे खड्डे, साफसफाई केली. त्यानंतर सकाळी ठिक १०.०० वाजता ग्रामीण रूग्णालय मुरूड व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. यामध्ये विविध आजारांवर प्राथमिक उपचार करण्यात आले तसेच तपासण्या करण्यात आल्या या शिबीरात ६२ रूग्णांची

Scanned with CamScanner

तपासणी करण्यात आली. भोजनानंतर दुपारच्या सत्रात मा.बाळासाहेब जाधव यांनी 'बहुजन चळवळीतील संत महापुरूष' या विषयावर तर नवोदित कवी मा.महेश पेंडपाले यांनी कविता सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

**दि.२५ मार्च २०२२** रोजी सकाळी १०.३० वाजता निवासी शिबीराचा समारोप समारंभ संपन्न झाला. या शिबीरातून विद्यार्थ्यांना दररोज बौध्दिक सत्रातून व्यक्तिमत्व विकास, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरणाचे महत्व, पर्यावरणाचा आरोग्याशी असणारा संबंध ग्रामस्वच्छता अशा विविध विषयावर तज्ञ प्राध्यापकांचे व्याख्यानातून उद्‌बोधन करण्यात आले. आणि खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद वाक्य 'NOT ME BUT YOU' असा धडा स्वयंसेवकांना सात दिवसीय शिबीरात देण्यात आला. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी माटेफळ गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, जि.प.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक, मेजर बालाजी गुटलकर या सर्वांनी अनमोल सहकार्य केले.

या शिबीरासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.बी.एस.पटाडे दादा, संस्थेचे सचिव ॲड.विजय पाटील, प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी तसेच माझे समिती सदस्य प्रा.डॉ.मीना कदम, प्रा.डॉ.गोरे बी.एम., प्रा.चव्हाण डी.आर., महाविद्यालयाचे सेवक श्री.सुनिल गाडे, श्री. बी.बी.देशमुख, रा.से.योजनेचा विद्यार्थी प्रतिनिधी सोमेश शिंदे व माजी प्रतिनिधी प्रकाश तावरे यांचेही सहकार्य लाभले या शिबीरात एकुण २१ मुले व १७ मुलींनी सहभाग नोंदवला.

....................

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud,Tq.Dist.Latur

Scanned with CamScanner

# ग्रामपंचायत कार्यालय, माटेफळ

ता. जि. लातूर

| | | |
|---|---|---|
| सौ. अल्का विठ्ठल खोसे<br>सरपंच | श्री.माडीबोयने के.एन.<br>ग्रामविकास अधिकारी | श्री.संजय बब्रुवान शिंदे<br>उपसरपंच |

जा.क्र.

दिनांक 26/03/2022

## · मूल्यांकन प्रमाणपत्र ·

प्रमाणित करण्यात येते की, मुरुड येथील संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे 'पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर व स्वच्छ भारत अभियान 2021-22 मध्ये मौजे माटेफळ येथे विशेष वार्षिक शिबीर दि. 19 मार्च 2022 ते 25 मार्च 2022 रोजी संपन्न झाले.

दि. 19 मार्च ते 25 मार्च 2022 या कालावधी मध्ये शिबीरार्थी व ग्रामस्थांच्या मदतीने ग्रामस्वच्छता, शोषखड्डे, जि.प.प्रा.शाळा माटेफळ प्रांगणातील मुरुम सफाई, आरोग्य उपकेंद्र माटेफळ परिसरात वृक्षारोपणासाठीचे खड्डे, साफसफाई या श्रमदानाशिवाय अंधश्रद्धा निर्मुलन, आरोग्यविषयक शिबीर, विविध तज्ञांची व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रमातून समाजप्रबोधन इ. साठी अंदाजित किंमत रुपये 50,000/- (पन्नास हजार रुपये फक्त) ची कामे पूर्ण केली

करिता सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ग्रामसेवक
ग्रा. कार्यालय माटेफळ
ता. जि. लातूर

सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय,
माटेफळ,ता.जि.लातूर

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud,Tq.Dist.Latur



Scanned with CamScanner

# ग्रामपंचायत कार्यालय, माटेफळ

ता. जि. लातूर

| | | |
|---|---|---|
| सौ. अल्का विठ्ठल खोसे<br>सरपंच | श्री.माळीबोयने के.एन.<br>ग्रामविकास अधिकारी | श्री.संजय बब्रुवान शिंदे<br>उपसरपंच |

जा.क्र.

**· प्रमाणपत्र ·**

दिनांक : 26/03/2022

प्रमाणित करण्यात येते की, मुरुड येथील संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे "पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर व स्वच्छ भारत अभियान 2021-22 विशेष शिबीर" दि. 19 मार्च 2022 ते 25 मार्च 2022 मध्ये मौजे माटेफळ ता.जि. लातूर येथे संपन्न झाले.

दि. 19 मार्च 2022 ते 25 मार्च 2022 या कालावधीत स्वयंसेवक व ग्रामस्थांच्या मदतीने जि.प.प्रा. शाळा माटेफळ प्रांगणातील मुरूम भराव, शाहावादी फरशी, प्राथमिक आरोग्य केंद्रात वृक्षारोपनासाठी खड्डे, साफसफाई, इत्यादी श्रमदानाशिवाय विविध तज्ञांची बौद्धिक व्याख्याने, आरोग्य शिबीर इ. कार्यक्रमामुळे ग्रामस्थांना फायदा झाला.

श्रमदान, बौद्धिक कार्यक्रम, आरोग्य शिबीर यामुळे ग्रामस्थांना एक नवी दिशा मिळाली व हे शिबीर यशस्वीपणे संपन्न झाले.

करीता सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय,
माटेफळ, ता.जि.लातूर

ग्रामसेवक
ग्रा.पं. कार्यालय माटेफळ
ता.जि.लातूर

Principal
Sambhaji College
Murud, Tq.Dist.Latur

स्वच्छ भारत अभियान

Scanned with CamScanner

1/1


दैनिक

ई-मेल [illegible]@gmail.com

# महावृत्त

संपादक : अशोक हनवते, मो. ९४२१०१४१११,७२६४००१११०

लातूर वर्ष २३ अंक ६२ वा शनिवार दि. १९ मार्च २०२२ पृष्ठ ४


# राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचे मौजे माटेफळ येथे आयोजन

मुरुड/:- समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड संचलित संभाजी महाविद्यालय मुरुड राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष युवक शिबिर मौजे माटेफळ ता.जि. लातूर येथे दिनांक १९ मार्च ते २५ मार्च २०२२ या दरम्यान होणार आहे. या शिबिराचा उद्घाटन सोहळा दि.२० मार्च २०२२ रोजी होत असून या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.बी. एस. पठाडे (दादा) उपस्थित राहणार असून उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे, महात्मा बसवेश्वर कॉलेज लातूर हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी, माटेफळ येथील प्रथम नागरिक सरपंच सौ. अलका विठ्ठल खोसे, उपसरपंच शिंदे संजय बब्रुवान, ग्रामसेवक माडेबोयने, मुख्याध्यापक श्री.कांबळे सर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. खोसे संतोष दगडू उपस्थित राहणार आहेत.तर या कार्यक्रमाच्या समारोपास दिनांक २५ मार्च २०२२ रोजी ॲड. विजय पाटील, सचिव समाज जागृती शिक्षण सं[illegible] मुरुड हे अध्यक्ष म्हणून लाभणार आहेत. त[illegible] कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. डॉ.सं[illegible] पाटील, दयानंद महाविद्यालय लातूर हे उपस्[illegible] राहणार आहेत.या विशेष युवक शिबिरा[illegible] २१ मुले व १७ मुली सहभागी होत अ[illegible] या शिबिरादरम्यान श्रमदानाबरोबरच बौद्[illegible] मार्गदर्शन तसेच आरोग्य शिबिराचे आयो[illegible] करण्यात आलेले आहे.पर्यावरण व नैस[illegible] साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी युवक [illegible] व स्वच्छ भारत अभियान यातील संक[illegible] शोषखड्डे, ग्रामसफाई, वृक्षारोपण, वनराई बंध[illegible] लोकसंख्या शिक्षण, जलव्यवस्थापन, व्यक्तिम[illegible] विकास इत्यादी संकल्प या शिबिरादरम्यान [illegible] करण्यात येणार आहेत असे महाविद्यालय[illegible] प्राचार्य डॉ. नरेंद्र माळी कार्यक्रमाधिकारी प्रा. [illegible] चावरे एम. व्ही., डॉ. मीना कदम, डॉ. गोरे [illegible] एम.,प्रा. चव्हाण डी. आर. व विद्यार्थी प्रतिनि[illegible] सोमेश शिंदे यांनी कळवले आहे.

Program Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
-413510

Principal
Sambhaji College
Murud,Tq.Dist.Latur

Scanned with CamScanner


पुरोगामी विचाराचे
एकमत

संभाजी महाविद्यालयात रासेयो शिबिर ▶प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांचे प्रतिप

# राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विक

लातूर : राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच ...र्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकासात आमूलाग्र बदल हा केवळ राष्ट्रीय ... योजनेमुळेच होऊ शकतो, असे प्रतिपादन ...डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी केले.

समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड ...लित संभाजी महाविद्यालय मुरुडच्या राष्ट्रीय ... योजनेचे विशेष युवक शिबिर माटेफळ ता. ... लातूर येथे १९ ते २५ मार्च या दरम्यान संपन्न ...त आहे. या शिबिराचा उद्घाटन सोहळा दि. ... मार्च रोजी संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत ...ते. या उद्घाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून ...माज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बी. एस. ...ठाडे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. नरेंद्र ...ळी, सरपंच सौ. अलका खोसे, मुख्याध्यापक ...वळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ...तापे खोसे, बापू खोसे, मेजर बालाजी



गुटलकर उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना जगातील सर्वात मोठी युवकांचा समावेश असलेली ही योजना असून या योजनेमध्ये फार मोठ्या प्रमाणावर युवकांचा सहभाग असलेला आपल्याला दिसून येतो, असे सांगून प्रा. डॉ डोंगरे म्हणाले की, ग्रामीण भागाच्या विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांचा सहभाग हा अत्यंत मोलाचा आणि महत्त्वाचा ठरलेला आहे असे ते म्हणाले.

यावेळी प्राचार्य डॉ. नरेंद्र माळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षी... बी. एस पठाडे यांनी केला. ... प्रास्ताविक प्रा. डॉ. चावरे एम. ... केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी. एम. ... तर आभार प्रदर्शन डॉ. कदम एम. ... केले. कार्यक्रमास प्रा. चव्हाण डी. ... महेंद्र आल्टे, रासेयो प्रतिनिधी शि... प्रकाश तावरे, ग्रामपंचायत सदस्य ... व्यवस्थापन समितीचे सदस्य, ... शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थि...


Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud, Tq.Dist.Latur

Scanned with CamScanner

दैनिक
ई-मेल dainikmahavrutt@gmail.com
# महावृत्त
संपादक : अशोक हनवते, मो. ९४२१०१४१११,७२६४०७१११०
वर्ष २१ अंक ६९ वा रविवार दि. २७ मार्च २०२२ पृष्ठे ४

## श्रमाबरोबरच ज्याला कळते अभ्यासाची नाडी त्याला मिळते लाल दिव्याची गाडी-. प्रा डॉ संतोष पाटील



मुरुड/महेंद्र आल्टे: राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरातून व्यक्तिमत्त्व विकास तर होतोच पण श्रमाबरोबरच ज्याला कळते अभ्यासाची नाडी त्यालाच मिळते लाल दिव्याची गाडी असे विचार प्रा.डॉ. संतोष पाटील यांनी मांडले.मौजे भाटेफळ तालुका जिल्हा लातूर येथे संभाजी महाविद्यालय मुरुड राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष शिबिराच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते पुढे बोलताना ते असे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिनानिमित्त परेडसाठी जाण्याची संधी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होते म्हणून स्वयंस्फूर्तीने राष्ट्रीय सेवा योजनेत सहभाग नोंदवून आपली संधी पक्की करावी असेही त्यांनी यावेळी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव मा. ॲड. विजय पाटील होते. अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते असे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना हे राष्ट्राप्रति समर्पित असणारी सेवा असून यातील प्रत्येक स्वयंसेवकाने काम करत असताना त्याची लाज न बाळगता त्यात समर्पित होऊन काम केले तर निश्चितच राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश सफल होईल म्हणून प्रत्येकाने स्वतःला झोकून काम करावे. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र भाळी यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच भंगावर गावचे सरपंच श्री. विठ्ठल खोसे व बालाजी गुट्टलकर यांनीही शिबिराविषयी आपले मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मीना कदम यांनी केले तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. चावरे मधुकर यांनी तर मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. गोरे बी.एम. यांनी मानले. या सात दिवसीय विशेष शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. , प्रा डॉ गोरे बी.एम.,प्रा. डॉ. मीना कदम डी. आर., प्रा. महेंद्र आल्टे महाविद्यालयाचे श्री देशमुख बी. बी., श्री. सुनील गाडे राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रतिनिधी सोमेश शिंदे,प्रक सर्व राष्ट्रीय सेवा योजनेतील सात दिवस विद्यार्थी विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist. Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud, Tq.Dist.Latur

संभाजी महाविद्यालय रा. से. यो. विशेष शिबीर (2021-22)




उद्घाटन प्रसंगी गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना मान्यवर.





उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist . Latur - 413510

Principal
Sambhaji College

Scanned with CamScanner

संभाजी महाविद्यालय, मुरुड रा. से. यो. विशेष शिबिर




विशेष शिबीरात श्रमदान करताना स्वयंसेवक




विशेष शिबीरात श्रमदान करताना स्वयंसेवक.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud,Tq.Dist.Latur

Scanned with CamScanner



विशेष शिबीरात श्रमदान करताना स्वयंसेवक




शहाबादी फरशी अंथरुण श्रमदान केलेले पाहणी करताना माण्यवरांसोबत स्वयंसेवक.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud, Tq. Dist. Latur

Scanned with CamScanner




श्रमदानापूर्वीची अवस्था.




श्रमदानानंतर शहाबादी फरशी सोबत माग्यवर.


Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud, Tq. Dist. Latur

Scanned with CamScanner




आरोग्य उपकेंद्रात श्रमदान करताना स्वयंसेवक




आरोग्य उपकेंद्रात श्रमदान करताना स्वयंसेवक

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College
Murud Tq Dist Latur

Scanned with CamScanner

MURUD

समाज जागृती शिक्षण संस्था संचलित

संभाजी कॉलेज,( कला वाणिज्य विज्ञान) मुरुड

तालुका .जिल्हा लातूर .

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर अहवाल

दिनांक 6 फेब्रुवारी,2023 ते 12फेब्रुवारी ,2023

समाज जागृती शिक्षण संस्था संचलित संभाजी महाविद्यालय मुरुड राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबिर मौजे निवळी

युवकांचा ध्यास ग्रामसेवक यासाठी युवक शिबिर यासाठी विषय हा विषय समोर ठेवून येथे दिनांक 6 फेब्रुवारी 2023 ते दिनांक 12 फेब्रुवारी 2023 दरम्यान विशेष शिबिर संपन्न झाले. या सात दिवसाच्या निवासी शिबिराचा समारोप दिनांक 12 फेब्रुवारी 2023 रोजी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला .या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव माननीय ऍडव्होकेट विजय पाटील हे होते .तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक डॉक्टर पांडुरंग शितोळे इंग्रजी विभाग प्रमुख श्रीमती सुशीला देवी देशमुख महाविद्यालय लातूर हे होते. तसेच या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नरेंद्र माळी हे देखील आवर्जून उपस्थित होते तसेच मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्रशाला निवळी श्री वेंकटराव गंगणे व ग्रामस्थ देखील या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नरेंद्र माळी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉक्टर भगत जी.एम ,.प्राध्यापक मधुकर क्षीरसागर, प्राध्यापक डॉक्टर अरुण कानडे ,प्राध्यापिका सौ महाजन मॅडम ,श्री सव्वाशे अरुण ,श्री गाडे सुनील, श्री देशमुख बालाजी यांनी विशेष

Scanned with CamScanner

परिश्रम घेतले .तसेच या शिबिराच्या यशस्वीतेसाठी मुख्य वाटा हा विद्यार्थ्यांचा असून त्यांनी उत्स्फूर्तपणे या शिबिराच्या यशस्वीते साठी प्रयत्न केले.

Principal
Sambhaji College (Arts & Commerce)
Murud,Tq.& Dist.Latur(M.S.) 413510

Scanned with CamScanner

MURUD

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष शिबिर2022-23

# मौजे .निवळी

# शिबिराचा अहवाल

संभाजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर दिनांक 6 फेब्रुवारी ते 12 फेब्रुवारी 2023 दरम्यान मौजे निवळी येथे संपन्न झाले. शि बीर अहवाल खालील प्रमाणे ---

## पूर्वतयारी

संभाजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर
निवळी गावामध्ये घ्यावे या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजनेचे प्राध्यापक मिळून निवळी येथे जाऊन वेळेचे सरपंच श्री अंगद जाधव यांची भेट घेतली. त्यांना शिबिराची पार्श्वभूमी सांगितली व शिबिरादरम्यान होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. हे स्वतः समाजसेवक असल्यामुळे त्यांनी या शिबिराला तात्काळ परवानगी दिली. परिसर शिबिराची लेखी परवानगी मागितली व त्यांनी देखील शिबिर घेण्यासाठी लेखी अनुमती दिली. शिबिर निवासस्थान साठी गावातील जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक श्री गंगणे व्यंकटराव सर यांची भेट घेतली. पाणी केल्यानंतर त्यांनी शिबिरासाठी तीन रूम देण्याचे मान्य केले. व शिबिरासाठी स्थान निश्चित केले. शिबिराची तारीख 6 फेब्रुवारी 2023 ते 12 फेब्रुवारी 2023 निश्चित करण्यात आली.

दिनांक 6 फेब्रुवारी रोजी महाविद्यालयातील शिबिरासाठी निवड झालेल्या स्वयंसेवकांना घेऊन ठीक दोन वाजता निवळी गावामध्ये पोहोचलो. निवासस्थानी

Scanned with CamScanner

सर्व साहित्य ठेवल्यानंतर सरपंच सोबत व ग्रामस्थांशी चर्चा केली व कोणकोणती कामे करता येतील हे निश्चित केले.

दिनांक 7/02/2023

## उद्घाटन समारंभ

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये माणसे पारखण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते- प्राचार्य डॉक्टर संजय वाघमारे

संभाजी महाविद्यालय मुरुड राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबीर दिनांक 6 फेब्रुवारी ते 12 फेब्रुवारी दरम्यान निवळी येथे संपन्न होत आहे .या शिबीराचा उद्घाटन समारंभ दिनांक 7 फेब्रुवारी रोजी उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. सर्वप्रथम राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी निवळी गावामध्ये जनजागरण रॅली काढली. व्यसनमुक्ती, मोबाईलचा दुरुपयोग, स्वच्छ व सुंदर गाव, बालविवाह प्रतिबंध, राष्ट्रीय एकात्मता,

झाडे लावा झाडे जगवा, धर्मनिरपेक्षता याबाबत घोषणा देत जनजागृती करण्यात आली. जनजागृती रॅली नंतर शिबिराचा उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. ,"युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास "हा शिबिराचा विषय असून या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रमुख पाहुणे शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संजय वाघमारे यांचे शुभ हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. आपल्या उद्घाटन पर भाषणामध्ये त्यांनी विविध पैलूवर मार्गदर्शन केले. संत गाडगे महाराजांकडे जन्मजात शहाणपण होते. त्यांनी जगाला स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. ते अनुभवाने प्राप्त ज्ञानामधून जनजागरण करत होते. आपल्या कीर्तनामधून परंपरेचर चुकीच्या रूढी परंपरा व अंधश्रद्धेवर कडवा प्रहार केला. आजच्या युवकांना चिंतन करण्याची वेळ आलेली आहे. आजचा युवक व्यसनमुक्त असला पाहिजे त्यामध्ये संवेदनशीलता असली पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामधून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. त्यामध्ये माणुसकी आणि संवेदनशीलता निर्माण होते. बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले या उक्ती प्रमाणे माणसाने जसे बोलले तसे वागले पाहिजे. ही

Scanned with CamScanner

गोष्ट महात्मा गांधीजी कडून शिकली पाहिजे .स्वतःला विकसित केले पाहिजे. आपण त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी. असे अनमोल मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री बी .एस. (दादा )पटाडे यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये बाबासाहेब परांजपे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी श्रमाचे महत्त्व जाणले पाहिजे. स्वतःचे काम स्वतः केले पाहिजे. अंधश्रद्धेमुळे मानवी जीवनाची मोठी हानी होते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये घडलेला विद्यार्थी कोठेही कमी पडणार नाही याची मला खात्री आहे. स्पर्धा परीक्षेमधून पुढे गेले पाहिजे एन एस एस मुळे जीवनाला वळण लागते. असे मौलिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित गावचे सरपंच माननीय श्री अंगद जाधव यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच आपल्या महाविद्यालयीन जीवनातील राष्ट्रीय सेवा योजनेचे अनुभव कथन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉक्टर भगत जी .एम .यांनी केले. सात दिवसाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरामध्ये कोण-कोणते उपक्रम राबवले जाणार आहेत व आपले उद्दिष्ट काय आहे यावर प्रकाश टाकला. या उद्घाटन समारंभ मध्ये जिल्हा परिषद प्रशाला निवळीचे मुख्याध्यापक श्री गंगणे व्यंकटराव हे आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नरेंद्र माळी सर यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक मधुकर क्षीरसागर यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉक्टर कानडे ए.एस. यांनी केले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉक्टर भगत जी.एम., प्राध्यापक मधुकर क्षीरसागर, प्राध्यापक डॉक्टर कानडे ए. एस. प्राध्यापिका सौ महाजन पी.बी. यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्साहामध्ये कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.

दुपारी बौद्धिक क्षेत्रामध्ये भारतीय राज्यघटना व मूलभूत अधिकार या विषयावर प्राध्यापक डॉक्टर चावरे यांनी यांचे व्याख्यान झाले.बालविवाह प्रतिबंध व महिला

Scanned with CamScanner

समस्या या विषयावर प्राध्यापक डॉक्टर गोरे श्री एम समाजशास्त्र विभाग संभाजी कॉलेज मुरुड यांचे प्रबोधन पर व्याख्यान झाले.

दिनांक 8 फेब्रुवारी ,2023

वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन

कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे बुधवार दिनांक 8 फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद प्रशाला निवळी परिसरातील वृक्षांना संवर्धन करण्यासाठी पाणी व्यवस्थापन करण्यासाठी आळे केले व झाडांना पाणी दिले साधारणपणे 200 झाडांना आळे करण्याचे काम श्रमदानातून स्वयंसेवकांनी केले. तसेच झाडे लावली .

## बौद्धिक कार्यक्रम

### जल पे चर्चा

आठ फेब्रुवारी 2023 रोजी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर निवळी येथे आज दुपारच्या सत्रामध्ये जल पे चर्चा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री विनायक तर जिल्हा कार्यकारी लातूर यांचे जनवे चर्चा या विषयावर व्याख्यान झाले पाण्याची दुर्भिक्ष पाण्याची महत्त्व जल ही जीवन है भविष्यातील पाण्या चे होणारे दुर्भिक्ष या विषयावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले शिबिरार्थी व ग्रामस्थ यांच्याशी पाणी या विषयावर चर्चा केली यामधून संदेश दिला की जल ही जीवन है जल बचाव जीवन बचाओ. या कार्यक्रमाचे अध्यक्ष निवळी गावचे सरपंच अंगद जाधव हे उपस्थित होते त्यांनीही पाण्याचे महत्व विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना पटवून दिले तसेच पाण्याचा वापर काटकसरीने केला पाहिजे इजराइल याचे आदर्श उदाहरण आहे असे आपल्या भाषणांमधून नमूद केले. कार्यक्रमाधिकारी डॉक्टर भगत प्राध्यापक मधुकर क्षीरसागर प्राध्यापक डॉक्टर कानडे ए. एस.

सौ महाजन पी.बी. हे उपस्थित होते तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चौभारकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कुमारी केवळ राम हिने केले. दुपारच्या सत्रामध्ये आजची शिक्षण

Scanned with CamScanner

व्यवस्था व बेरोजगारी या विषयावर प्राध्यापक पवार डी .एम .यांचे व्याख्यान घेण्यात आले. तसेच युवकांपुढील आव्हाने या विषयावर मराठी विभागाचे प्राध्यापक मोतीबोने एस .आर . यानी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले गेले. रात्री आठ वाजता मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

दिनांक 9 फेब्रुवारी 2023

## स्वच्छता व वृक्षसंगोपण

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आजच्या दिवशी गावातील रस्त्यावर येणारे पाणी व्यवस्थित नाली मध्ये लावणे त्या स्वच्छ करणे हा कार्यक्रम राबवला. साधारणपणे दीडशे झाडांना पाणी व्यवस्थापन करण्यासाठी झाडांना संरक्षित आळी केली व झाडांना पाणी दिले तसेच शाळा परिसरामध्ये लावण्यात आलेल्या विटा व्यवस्थितपणे रांगेमध्ये लावल्या व शाळेच्या सौंदर्यामध्ये शोभा वाढवली. दुपारच्या बौद्धिक क्षेत्रामध्ये लोकसंख्या विस्फोट समस्या व उपाय या विषयावर भूगोल विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर वाघमारे एच.एस. यांचे व्याख्यान झाले. लोकसंख्या वाढीमुळे होणारे दुष्परिणाम व त्यावर काय उपाय केले पाहिजे यावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. आधुनिक युगामध्ये डिजिटल साक्षरता काळाची गरज आहे त्यामुळे डिजिटल साक्षरता या विषयावर भूगोल विभागाचे प्राध्यापक डॉक्टर जाधव जी .एल. डिजिटल साक्षरता या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच जाणता राजा या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली यामध्ये सर्व स्वयंसेवकांनी भाग घेतला.

दिनांक 10 फेब्रुवारी ,2023

आरोग्य शिबीर

## सर्व रोग निदान शिबीर

संभाजी महाविद्यालय मुरुड च्या राष्ट्रीय सेवा योजना चे शिबीर निवळी येथे दि 6फेब्रुवारी ते 12फेब्रुवारी 2023दरम्यान संपन्न होत आहे.या शिबिर मध्ये दि10फेब्रुवारी 2023रोजी सर्व रोग. निदान आरोग्य शिबीर घेण्यात आले याप्रसंगी

Scanned with CamScanner

मुरुड ग्रामीण रुग्णालय मुरुड येथील डॉ.शीतल लोंढे, डॉ.वाघमारे, डॉ.कुलकर्णी यांनी रुग्णांचे रोगनिदान केले. व औषध उपचार केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी निवळी गावामध्ये घरोघर जाऊन गावकऱ्यांना आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले चे सांगितले.या शिबिरात एकूण 95रुग्णांची तपासणी करण्यात आली. गावकऱ्याकडून भरपूर प्रतिसाद मिळाला.या कार्यक्रमाचे यशस्वीते साठी सर्व रा.से. यो. चे स्वयंसेवकांनी भरपूर परिश्रम घेतले.तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉक्टर भगत जी. एम्.,प्रा. मधुकर

क्षीर सागर, डॉ कानडे ए. एस.यांनी विशेष परिश्रम घेतले.

बौद्धिक कार्यक्रमांमध्ये दुपारच्या सत्रामध्ये व्यसनमुक्ती वाचन युवक या विषयावर प्राध्यापक वाघमारे मराठी विभाग यांचे व्याख्यान झाले यामध्ये विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे. हे आरोग्य बरोबरच परिवारासाठी देखील हानिकारक आहे. शिवाजीचा विद्यार्थी हा व्यसनमुक्त असला पाहिजे असे त्यांनी आवाहन केले. राष्ट्रीय एकात्मता काळाची गरज या विषयावर प्राध्यापक बिराजदार डी. एस .यांचे व्याख्यान झाले. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामधून कशी राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाते तसेच पूर्ण देशांमध्ये राष्ट्रीय एकात्मता कशी काळाची गरज आहे हे आपल्या व्याख्यानातून पटवून दिले.सायंकाळी मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक 11 फेब्रुवारी ,2023

## योगप्रशिक्षण

कार्यक्रम पत्रिका प्रमाणे दिनांक 11 रोजी सकाळी सात वाजता योग प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले यामध्ये श्री धनंजय बोरकर व सर्व सहकारी मुरुड येथून बोलवण्यात आले होते. या शिबिरामध्ये सर्व स्वयंसेवक व प्राध्यापक सहभागी झाले होते.

योगा प्राणायाम आरोग्यासाठी कसे आवश्यक आहे हे प्राध्यापक मधुकर क्षीरसागर

Scanned with CamScanner

यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. निरोगी शरीरासाठी योगा आवश्यक [illegible] ना पटवून दिले. बोरकर व त्यांचे सहकारी यांनी सर्व विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षण दिले व विविध प्रकारचे आसणे शिकवलीव करून घेतली.

## ग्राम स्वच्छता कार्यक्रम

संभाजी महाविद्यालय मुरुड च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक 11 फेब्रुवारी 2023 रोजी निवळी गाव ग्राम स्वच्छता अभियान संपन्न झाले .या अभियानामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पूर्ण निवळी गावाची स्वच्छता केली. तसेच गावामध्ये पथनाट्य देखील सादर केले पथनाट्याचा विषय होता मोबाईलचे दुष्परिणाम या पथनाट्यास निवळी गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी या पथनाट्य मधून मोबाईलचे कसे दुष्परिणाम होतात हे नाटकाच्या माध्यमातून सादर केले .या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम करून ग्राम स्वच्छता केली व निवळी गाव स्वच्छ केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉक्टर भगत जी.एम .प्राध्यापक मधुकर क्षीरसागर, प्राध्यापक डॉक्टर अरुण कानडे ,प्राध्यापिका महाजन मॅडम प्राध्यापिका अत्तार मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. बौद्धिक क्षेत्रामध्ये शेतकरी समस्या या विषयावर प्राध्यापक सुतार शैलेंद्र यांचे व्याख्यान झाले.

सायंकाळी मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

संभाजी महाविद्यालय मुरुड राष्ट्रीय सेवा योजना युवक विशेष शिबिर मौजे निवळी दिनांक 12 फेब्रुवारी 2023

## समारोप समारंभ

संभाजी महाविद्यालय मुरुडच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर मौजे निवळी येथे दिनांक 6 फेब्रुवारी ते 12 फेब्रुवारी दरम्यान संपन्न झाले. या शिबिराचा समारोप समारंभ दिनांक 12 फेब्रुवारी 2023 रोजी दहा वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव एडवोकेट

Scanned with CamScanner

विजय पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक डॉक्टर पांडुरंग शितोळे इंग्रजी विभाग प्रमुख श्रीमती सुशीला देवी देशमुख महाविद्यालय लातूर हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये संभाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नरेंद्र माळी सर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी निवळी गावचे सरपंच श्री अंगद सिताराम जाधव हे देखील उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी शिवाजी महाविद्यालय रेनापुर चे प्राध्यापक डॉक्टर आर .सी. जाधव हे देखील उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे डॉक्टर पांडुरंग शितोळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सखोल मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व फुलवते. विद्यार्थ्यांचा मार्ग वैशिष्ट्यपूर्ण असला पाहिजे. त्यांचे विचार करणे वागणे व बोलणे हे आदर्श असले पाहिजे. एन एस एस हे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवते. विद्यार्थ्यांच्या आचरणामध्ये बदल करते. राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे स्वयंसेवकाची जडणघडण करते. कॉलेज हे इन्फॉर्मेशन सेंटर आहे तर एनएसएस शिबीर हे प्रात्यक्षिक सेंटर आहे. राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करते. विद्यार्थ्यांनी चांगल्या व्यक्तींच्या सानिध्यात यावे. एन .एस .एस. सी नाते जोडते. नाते टिकवणआवश्यक आहे.

प्रमुख पाहुणे डॉक्टर पांडुरंग शितोळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सखोल मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व फुलवते. विद्यार्थ्यांचा मार्ग वैशिष्ट्यपूर्ण असला पाहिजे. त्यांचे विचार करणे वागणे व बोलणे हे आदर्श असले पाहिजे. एन एस एस हे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवते. विद्यार्थ्यांच्या आचरणामध्ये बदल करते. राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे स्वयंसेवकाची जडणघडण करते. कॉलेज हे इन्फॉर्मेशन सेंटर आहे तर एनएसएस शिबीर हे प्रात्यक्षिक सेंटर आहे. राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करते. विद्यार्थ्यांनी चांगल्या व्यक्तींच्या सानिध्यात यावे. एन .एस .एस. सी नाते जोडते. हे नाते टिकवले पाहिजे .नाते टिकवण्यासाठी संवेदनशीलता

Scanned with CamScanner

आवश्यक आहे. पाणी आणि वाणी ही महत्त्वाची असते. चांगले बोला, चांगले वागा ,चांगला विचार करा. व्यक्तिमत्व विकासासाठी मेंदू वापरता आला पाहिजे वर्तनामध्ये सकारात्मक बदल झाला पाहिजे. एन. एस. एस. चा विद्यार्थी शिबीरामध्ये माणूस ओळखायला शिकतो. त्याचे विचार बदलतात त्याचे वर्तन बदलते. आपण आपल्या आई वडिलांचे देणे लागतो .आपण आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले पाहिजे. नेहमी स्वप्न ही मोठी पाहिली पाहिजेत. आपण आपणाला कधीही कमी समजू नये. अध्यक्षीय समारोप मध्ये एडवोकेट विजय पाटील यांनी स्वयंसेवकांना विशेष मार्गदर्शन केले. सेवाधर्म महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय सेवा हाच आपला धर्म आहे. साधना ,सेवा, सत्संग याला जीवनामध्ये महत्त्व असते. याला जोडण्यासाठी ज्ञान महत्त्वाचे आहे .यासाठी वेगवेगळ्या व्यक्तींना बोलावून आपले प्रबोधन करण्यात आले. ज्ञानगंगा आपल्या दारी आणली. शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये बदल घडतो. शिबिरामधून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आपण या शिबिरादरम्यान घेतलेले शिक्षण हे वाया जाऊ नये. ते शंभर टक्के ग्रहण करा .जीवनासाठी शिबिरात गोडी निर्माण व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमामध्ये निवळी गावचे सरपंच श्री. अंगद सिताराम जाधव यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉक्टर नरेंद्र माळी यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वीतेबद्दल सर्वांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉक्टर भगत जी.एम .यांनी केले. सात दिवसाच्या शिबिरामध्ये कोणकोणते उपक्रम ,कार्यक्रम राबवण्यात आले याचा लेखाजोखा सर्वांसमोर ठेवला. या शिबिरादरम्यान वृक्षारोपण वृक्ष संवर्धन, श्रमदान ,आरोग्य शिबीर, योग प्रशिक्षण, ग्राम स्वच्छता व बौद्धिक व्याख्यान पर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये निवळी गावचे सरपंच श्री. अंगद सिताराम जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच जिल्हा परिषद प्रशाला निवळीचे मुख्याध्यापक व्यंकटराव गंगणे यांचे देखील विशेष सहकार्य लाभले. समारोप कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवकांनी आपले मनोगत मांडले व

Scanned with CamScanner

आपल्या वर्तनात बदल झाला. हे आपल्या भाषणांमधून सांगितले. आपल्या अनुभवाचे कथन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक मधुकर क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉक्टर कानडे ए.एस. यांनी केले. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी प्राध्यापक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नरेंद्र माळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक डॉक्टर भगत जी.एम., प्राध्यापक मधुकर क्षीरसागर, प्राध्यापक डॉक्टर कानडे ए. एस., प्राध्यापिका सौ. महाजन मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. श्री सव्वाशे अरुण, श्री बालाजी देशमुख, श्री सुनील गाडे यांनी देखील विशेष परिश्रम घेतले. शिबिरार्थी विद्यालय विद्यार्थ्यांनी मेहनत आणि चिकाटी च्या सहाय्याने शिबीर यशस्वी करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावली.

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.),
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

# प्रमाणपत्र

दि : १४/२/२०२३

प्रमाणित करण्यात येते की संभाजी महाविद्यालय मुरुडच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर मौजे निवळी येथे दिनांक **6 फेब्रुवारी 2023** ते **12 फेब्रुवारी 2023** दरम्यान संपन्न झाले या शिबिराचा विषय ,"युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास "असा होता. या शिबिरा दरम्यान स्वयंसेवक व ग्रामस्थांच्या मदतीने जिल्हा परिषद प्रशाला निवळी ग्रामपंचायत झाडांना आळे करणे त्यांना पाणी देणे त्यांचे संवर्धन करणे, परिसर स्वच्छता, ग्राम स्वच्छता तसेच विटा रांगेत लावणे, सर्व रोग निदान शिबीर, जनजागरण ,ग्राम स्वच्छता ,मंदिर स्वच्छता , मोबाईलचे दुष्परिणाम या विषयावर पथनाट्य, व्यक्तिमत्व विकास,जल पे चर्चा. असे कार्यक्रम राबवले.विविध तज्ञांची मार्गदर्शक व्याख्याने आयोजित केली. या कार्यक्रमामुळे ग्रामस्थांना नक्कीच लाभ झाला. या शिबिरामुळे, बौद्धिक कार्यक्रमामुळे ग्रामस्थांना एक नवी दिशा मिळाली हे शिबीर यशस्वीपणे संपन्न झाले .

करिता सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय निवळी

ग्रामसेवक/सरपंचस
ग्रामपंचायत कार्यालय,निवळी.
ता.लातूर जि.लातूर.

Scanned with CamScanner

# मूल्यांकन प्रमाणपत्र

दि.-१५/२/२०२३

प्रमाणित करण्यात येते की संभाजी महाविद्यालय ,मुरुड चे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर दिनांक 6 फेब्रुवारी ते 12 फेब्रुवारी2023 दरम्यान निवळी गावामध्ये संपन्न झाले. या शिबिराचा विषय **"युवकांचा ध्यास ग्राम -शहर विकास"** हा होता. या शिबिरादरम्यान शिबिरार्थींनी ग्रामस्थांच्या मदतीने ग्राम स्वच्छता, वृक्ष संवर्धन, साधारणपणे 400 झाडांना आळी केली व पाणी दिले. तसेच मंदिर स्वच्छता, साफसफाई अंधश्रद्धा निर्मूलन, मोबाईलचे दुष्परिणाम या विषयावर पथनाट्य, आरोग्यविषयक शिबिर घेतले, योग प्रशिक्षण शिबिर घेतले, गावामध्ये जनजागृती केली, झाडे लावा झाडे जगवा, अंधश्रद्धा काढून टाका ,जातीयता नष्ट करा, बालविवाह प्रतिबंध, मोबाईल चा अतिवापर वापर टाळा,बेटी बचाव बेटी पढाओ.असा संदेश गावांमध्ये पोहोचवला.विविध तज्ञांची शेतकरी समस्या, लोकसंख्या विस्फोट, व्यसनमुक्ती, डिजिटल साक्षरता ,युवकांपुढील आव्हाने ,राज्यघटना व मूलभूत अधिकार ,बालविवाह प्रतिबंध, जल पे चर्चा,या विषयावर प्रबोधन पर कार्यक्रम आयोजित केला .या कार्यक्रमांमधून स्वयंसेवक व निवळी ग्रामस्थांचे प्रबोधन केले. सात दिवसाच्या या शिबिरामध्ये शिबिरार्थींनी भरपूर मेहनत घेऊन अंदाजे 50 हजार रुपयाची कामे केली.

करिता सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.


ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय निवळी

सरपंच
ग्रामसेवक/सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय निवळी
ग्रामपंचायत कार्यालय,निवळी.
ता.लातूर जि.लातूर.

Scanned with CamScanner

[illegible]







Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.).
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner







Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.)
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner




श्रमदान कार्यक्रम





श्रमदान कार्यक्रम

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.),
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner



Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510


Principal
Sambhaji College (Arts & Com.)
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

वृक्ष संवर्धन

संभाजी कॉलेज, मुरुड
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष शिबिर 2022-23




ग्राम स्वच्छता





ग्राम स्वच्छता

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.),
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner





वृक्ष संवर्धन कार्यक्रम

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.)
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner

संभाजी कॉलेज मुरुड
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष शिबीर 2022-23
श्रमदान ग्राम सफाई




ग्राम सफाई




ग्राम सफाई

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.)
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

Scanned with CamScanner





पथनाट्य

Programme Officer
N.S.S. Department
Sambhaji College, Murud
Tq & Dist : Latur - 413510

Principal
Sambhaji College (Arts & Com.)
Murud, Tq. & Dist. Latur (M.S.)

MUROD

# संभाजी कॉलेज मुरुड

## राष्ट्रीय सेवा योजना 2023 -24

## विशेष शिबीर अहवाल

शैक्षणिक वर्ष 2023 24 चे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर मौजे निवळी तालुका व जिल्हा लातूर येथे दिनांक 6 फेब्रुवारी 2024 ते 12 फेब्रुवारी 2024 दरम्यान संपन्न झाले.

या शिबिराचा अहवाल खालील प्रमाणे सादर करत आहे.

**शिबीर स्थळी प्रस्थान**

दिनांक 6 फेब्रुवारी ,2024 रोजी संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व प्राध्यापक यांचे सकाळी ठीक दहा वाजता निवळी या गावी प्रस्थान झाले. निवळी या गावी पोचल्यानंतर जिल्हा परिषद प्रशाला निवळी येथे निवासस्थानी पोहोचलो. सायंकाळी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्यासोबत चर्चा करण्यात आली व नियोजन करण्यात आले.

**उद्घाटन समारंभ**

दिनांक 7फेब्रुवारी, 2024रोजी संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन सकाळी ठीक 11=00 वाजता संपन्न झाले. 'युवकांचा ध्यास :ग्राम- शहर विकास' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अशोक काळम उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सुशिलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय ,लातूर चे प्राचार्य डॉक्टर अजय पाटील हे उपस्थित होते. संभाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन उत्साहाच्या वातावरणामध्ये पार पडले. या कार्यक्रमांमध्ये उद्घाटक माननीय प्राचार्य डॉक्टर अजय पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले ,युवक हा या देशाचा आधारस्तंभ आहे. विकासामध्ये युवकांची भूमिका ही महत्त्वाची आहे. राष्ट्रीय सेवा योजनेमधून समाज सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते . जाते तिचा पूर्ण लाभ घेतला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामधून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेला अहंकार आपोआप गळून पडतो. विद्यार्थ्यांमध्ये सेवाभावी वृत्ती निर्माण होते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. विद्यार्थ्यांनी शिस्त पाळावी. त्यांनी सामाजिक हिताचे भान ठेवावे. ध्येय निश्चिती करून त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी .त्यामुळे समाज विकासाच्या वाटेवरती मार्गक्रमण करू शकेल. असे प्रतिपादन उद्घाटक माननीय प्राचार्य डॉक्टर अजय पाटील यांनी केले. अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अशोक काळम यांनी आपल्या अनुभवाचे कथन केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Scanned with CamScanner

एक हजार रू मिळवतो.काम छोटे किंवा मोठे नसते.मिळेल ते काम करा.निराशा बाळगू नका.सकारात्मक रहा.सक्रिय रहा.प्रामाणिक रहा.गुणांचा विकास करा.प्रयत्न करत रहा. असे विचार त्यांनी आपल्या व्याख्यानां मधून मांडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यक्रमाधिकारी डॉक्टर भगत जी.एस हे होते. या कार्यक्रमासाठी सहकार्यक्रमाधिकारी डॉक्टर अरुण कानडे प्राध्यापक नंदकुमार पैठणकर प्राध्यापिका सौ. महाजन पी.बी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वृक्ष संवर्धन कार्यक्रम**

आज राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी वृक्षा चे संवर्धन केले.. का. मौजे निवळी येथील ग्रामपंचायत कार्यालय परिसरातील वृक्ष संवर्धनाचे कार्य पूर्ण केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक ंनी पंचायत परिसरात सफाईचे काम केले तसेच झाडांना आळे करून त्यांना पाणी देण्यात आले. महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी तसेच सर्व प्राध्यापकांनी यामध्ये कार्य केले. यामध्ये प्रामुख्याने प्राध्यापक डॉ.कानडे सर तसेच कार्यक्रमाधिकारी डॉ .भगत सर , प्रा .पैठणकर सर.प्रा. सौ.महाजन मॅडम यांचा समावेश होता. सर्व स्वयंसेवकांनी व प्राध्यापकांनी वृक्ष संवर्धनाची जबाबदारी पार पडली. . तसेच जिल्हा परिषद शाळा निवळी परिसरातही वृक्ष संवर्धनाचे कार्य करण्यात आले . वृक्षांना आळे करून पाणी देण्यात आले. मौजे निवळी येथे 98 झाडांना वृक्ष संवर्धन करण्यात आले. खूप आनंदाने आणि उत्साहाने सर्व सेवकानी कार्य पूर्ण केले. उत्साहाने आजचा हा वृक्ष संवर्धनाचा कार्यक्रम पार पडला.

**बौद्धिक सत्र**

आज दिनांक 9 फेब्रुवारी, 2024 रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉक्टर अंबाड आर. एफ. यांचे वृक्षसंवर्धन काळाची गरज या विषयावर व्याख्यान झाले. तसेच वाणिज्य विभागाचे प्राध्यापक चौधरी प्रल्हाद यांचे तंटामुक्ती अध्यक्ष यांची भूमिका या विषयावर व्याख्यान झाले.

**श्रमदान कार्यक्रम व वृक्षारोपण व आरोग्य शिबीर**

राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामध्ये 10 फेब्रुवारी रोजी वृक्ष संवर्धन, वृक्षारोपण व एच .बी तपासणी शिबीर घेण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी जिल्हा परिषद प्रशाला निवळी परिसरातील झाडांना पाणी दिले .तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र निवळी परिसरातही झाडांना आळे केले व वृक्षारोपण करण्यात आले.10झाड लावली.प्राथमिक आरोग्य केंद्र न्यू येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांचा एचडी तपासण्याचे शिबीर घेण्यात आले तसेच आरोग्य केंद्रातील डॉक्टर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांना आरोग्य विषयक माहिती दिली.

**बौद्धिक कार्यक्रम**

दुपारच्या सत्रामध्ये बौद्धिक कार्यक्रमांतर्गत प्राध्यापिका अत्तार मॅडम यांचे व्याख्यान झाले. या व्याख्यानां मधून त्यांनी विस्तृत दहेज एक कुप्रथा विषयावर मार्गदर्शन स्वयंसेवकांना केले.

Scanned with CamScanner

## योगाभ्यास शिबीर

दिनांक 11 फेब्रुवारी ,2024 रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवळी येथील शिबिरामध्ये योग प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. या शिबिरामध्ये मुरुड येथील धनंजय भोरकर व त्यांचे सहकारी महर्षी पतंजली योगा शाखा मुरुडचे सदस्य भोंग पाटील, अनिल माळी, श्री कचोळया, सुदर्शन मगर हे सर्व प्रशिक्षक निवळी येथे आले आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना योगाचे महत्व समजावून सांगितले तसेच योगासनाचे प्रात्यक्षिक करून प्रशिक्षण शिबिरातील सर्व स्वयंसेवकांना दिले. या मध्ये योगासनाचे विविध प्रकार व प्राणायाम चे प्रशिक्षण दिले. शिबिरामध्ये सूर्यनमस्कार , भास्त्रिका, अलोम विलोम, वज्रासन, पद्मासन, ऊर्जा, ओमकार, मानेचे व्यायाम खांद्याचे व्यायाम, पोटाचे व्यायाम, ताडासन, पवन मुक्त आसन इत्यादी प्रकारचे आसन प्रकार विद्यार्थ्यांकडून करून घेतले. या शिबिरामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला. तसेच या योगासना मध्ये कार्यक्रमाधिकारी डॉक्टर भगत जी.एम., प्रा.डॉ. कानडे, प्रा. पैठणकर, प्राध्यापिका सौ .महाजन मॅडम ,श्री सव्वाशे व श्री गाडे यांनी सहभाग घेतला.

## पथनाट्य (बालविवाह)

दिनांक 11 फेब्रुवारी 2024 रोजी शिबिरा दरम्यान निवळी या गावामध्ये आले वाह हे पथनाट्य सादर करण्यात आले. बालविवाह करणे कायद्याने कसे गुन्हा आहे हे पथनाट्य मधून मांडण्यात आले तसेच बेटी बचाव बेटी पढाव हा संदेश देखील या पथनाट्य म्हणून देण्यात आला या पथनाट्यास गावकऱ्यांकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. पथनाट्य नंतर ग्रामसफाई कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये निवळी गावातील शिवाजी चौक ते निळकंठेश्वर मंदिर हा रस्ता साफ करण्यात आला यामधून स्वच्छतेचे महत्व आणि जनजागृती करण्यात आली.

## बौद्धिक सत्र

बौद्धिक क्षेत्रामध्ये प्राध्यापक सुतार सर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी जागतिकीकरण व भारत देश या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले.

## समारोप कार्यक्रम संभाजी कॉलेज,मुरुड

